cmyk

अ दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१९९ | शुक्रवार दि.०९ ऑक्टोबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय....

### मेक इन इंडिया' की 'मित्रभांडवलशाही'?

जागतिक स्तरावर तंत्रज्ञान आणि गुंतवणुकीचा महामार्ग भारतात आणण्याचे दावे करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार सध्या एका मोठ्या जागतिक वादाच्या भोवऱ्यात अडकले आहे. अब्जाधीश उद्योगपती आणि स्पेसएक्स चे प्रमुख इलॉन मस्क यांनी भारताच्या सॅटलाईट इंटरनेट क्षेत्रात प्रवेश करण्यास होत असलेल्या विलंबावरून थेट देशातील ''काही धनिकांवर'' आणि अप्रत्यक्षपणे सरकारी यंत्रणेवर गंभीर आरोप केले आहेत. भारताच्या ग्रामीण आणि दुर्गम भागातील जनतेला डिजिटल क्रांतीपासून दूर ठेवणे हा एक ''गुन्हेगारी स्वरूपाचा कट'' आहे, असे मस्क यांनी म्हटले आहे. मस्क यांच्या या 'ओलिगार्की' (धनिकशाही) च्या दाव्यानंतर केंद्रीय दळणवळण मंत्रालयाने हे आरोप फेटाळले असले तरी, या वादाने मोदी सरकारच्या 'इझ ऑफ डुइंग बिझनेस', 'मेक इन इंडिया' आणि जागतिक गुंतवणूक धोरणांचे वस्त्रहरण केले आहे.

# शेतकरी प्रश्नांवर किसान सभेचा एल्गार

## अकोल्यातून मुंबईकडे लाँग मार्च, दुष्काळ, शेतकरी आणि पीक विम्याच्या प्रश्नांवर राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

कोल्हापूर । प्रतिनिधी

**दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत, नियमित कर्जदार शेतकऱ्यांनाही आर्थिक दिलासा, देवस्थान इनाम वर्ग–३, वनजमीन, गायरान व वरकस जमिनींचे प्रश्न तसेच पीक विम्याच्या प्रलंबित मागण्यांसाठी अखिल भारतीय किसान सभेने राज्यव्यापी निर्णायक आंदोलनाची घोषणा केली आहे. या आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले येथून शेकडो वाहनांचा लाँग मार्च मुंबईच्या दिशेने काढण्यात येणार आहेत.**

अखिल भारतीय किसान सभेच्या महाराष्ट्र राज्य २४व्या अधिवेशनाची कोल्हापूर येथे सांगता झाली. ६ ते ८ ऑक्टोबरदरम्यान झालेल्या या अधिवेशनात राज्यभरातील ३०६ प्रतिनिधींनी सहभाग घेतला. किसान सभेचे राज्य सचिव डॉ. अजित नवले यांनी राजकीय, वैचारिक, संघटनात्मक आणि कामकाजाचा अहवाल मांडला. चर्चेनंतर हा अहवाल एकमताने मंजूर करण्यात आला. कर्जमाफी, भीषण दुष्काळ आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी अकोले येथे राज्यव्यापी महामुक्काम आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याआधी १५ ऑक्टोबर रोजी अकोले येथे भव्य मोर्चा काढून राज्य सरकारला शेतकऱ्यांच्या मागण्यांचे निवेदन देण्यात येणार आहे. त्यानंतर २१ ऑक्टोबरपासून अकोले येथे महामुक्काम आंदोलनाला सुरुवात होईल. या आंदोलनाला राज्यभरातील शेतकऱ्यांचा प्रतिसाद मिळविण्यासाठी किसान सभेने व्यापक तयारी सुरू केली आहे. २२ ऑक्टोबर रोजी कॉ. वृंदा करात, किसान सभेचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे, माजी



आमदार जे. पी. गावित आणि आमदार विनोद निकोले हे अकोले येथील महामुक्काम आंदोलनाला भेट देऊन सभेला संबोधित करणार आहेत. राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास आंदोलनाची तीव्रता वाढविण्याचा निर्णय किसान सभेने घेतला आहे. त्यानुसार २६ ऑक्टोबर रोजी अकोले येथून शेकडो वाहनांचा लाँग मार्च मुंबईच्या दिशेने रवाना होणार आहे. हा लाँग मार्च २७ ऑक्टोबर रोजी मुंबईत पोहोचेल. त्यानंतर मुंबईत राज्यव्यापी बेमुदत महामुक्काम आंदोलन सुरू करण्याचा निर्णय अधिवेशनात घेण्यात आला. दरम्यान, जनवादी महिला संघटनेच्या केंद्रीय नेत्या मरियम ढवळे, सीटूचे कामगार नेते एम. एच. शेख, ▶▶ पान २ वर

## अभिनयाचा बुलंद आवाज शांत!

### नाना पाटेकर यांचे निधन, महाराष्ट्रासह सिनसृष्टीवर शोककळा

मुंबई । प्रतिनिधी

**ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे गुरूवारी पहाटे गोव्यात हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. नाना पाटेकर यांच्या निधनामुळे चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली असून, मराठीसह बॉलिवुड चित्रपटसृष्टीतील कलाकार, राजकीय वर्तुळातील नेतमंडळी शोक व्यक्त केला आहे.**



मराठी रंगभूमी तसेच मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील अतुलनीय योगदानाची दखल घेऊन, अभिनेते नाना पाटेकर यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने घेतला, अशी घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली. तर, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनीही मी माझ्या जवळचा मित्र गमावला असल्याचे म्हणत दुःख व्यक्त केले. दरम्यान, नाना पाटेकर यांच्या पार्थिवावर पुण्यातील सिंहगडाच्या पायथ्याशी असलेल्या डोणजे गावातील त्यांच्या शेतातच अंत्यसंस्कार करण्यात येणार ▶▶ पान २ वर

## मराठवाड्यासह विदर्भातील बळीराजाचा आधारवड हरवला; दुष्काळमुक्तीसाठी लढा, शेतकऱ्यांचे पुसले अश्रू

मुंबई । प्रतिनिधी



राज्यात भीषण दुष्काळ पडला, अनेक शेतकऱ्यांनी जीवन संपवले. हा संकट मोठे होते. अशावेळी नाना पाटेकर यांचे संवेदनशील मन हेलावले. त्यांनी अभिनेते मकरंद अनासपूरे यांच्या मदतीने नाम फाऊंडेशन उभारले. त्यातून दुष्काळमुक्तीसाठी लढा दिला. बळीराजा त्यांना कधीही विसरणार नाही.

नानांच्या अचानक एक्झिटमुळे अनेकांना मोठा धक्का बसला. विशेषत: विदर्भ, मराठवाड्यातील शेतकऱ्यांचा आधारवड हिरावला. केवळ अभिनयापूरते त्यांचे व्यक्तिमत्व मर्यादित नव्हते.. अनेक क्षेत्रात त्यांनी अमिट ठसा उमटवला होता. ते सामाजिक भान जपणारे अभिनेते होते. २०१४–१५ मध्ये मराठवाडा आणि विदर्भावर दुष्काळाचे सावट होते. शेतकऱ्यांच्या आत्महत्येने समाजमन हेलावले. नानांच्या काळीज हेलावले. त्यांनी अभिनेते मकरंद अनासपूरे यांच्या सोबत मिळून ▶▶ पान २ वर

### लाखो शेतकऱ्यांना 'नाम'चा आधार

'नाम' फाऊंडेशनच्या संकेतस्थळावरील माहितीनुसार, ७७,१७,००० लाख शेतक–यांना या संस्थेने मदत केली आहे. ५०,९०८ कुटुंबांना मदत केली. तर वीरगती प्राप्त लष्करी जवानांच्या १०२ कुटुंबांना आर्थिक मदत करण्यात आली आहे. ४,९५७ विधवांना या फाऊंडेशनने मदत केली आहे. राज्यातील २१८७ गावांपर्यंत नाम फाऊंडेशन पोहचले आहे. यामुळे १,२७,२३,१२६ कोटी लोकांना पाण्याची सोय होण्यासाठी मदत झाल्याचे या संकेतस्थळावर म्हटले आहे.

## महागड्या औषधांवरून सर्वोच्च न्यायालयाची सरकारला चपराक

### केंद्राला दिले समिती स्थापन करण्याचे निर्देश



नवी दिल्ली । प्रतिनिधी

महागड्या औषधांच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाने आक्रमक भूमिका घेतली आहे. या प्रश्नी आता केंद्र सरकारने एक समिती स्थापन करावी असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. या प्रश्नी 'फेडरेशन ऑफ मेडिकल अँड सेल्स रिप्रेझेंटेटिव्हज असोसिएशन्स'ने २०२१ मध्ये दाखल केलेल्या याचिकेवर न्यायालयाने सरकारला अहवाल सादर करण्याचेही निर्देश दिले आहेत.

औषध कंपन्यांकडून स्वतःच्या ब्रँडची महागडी औषधे लिहून देण्यासाठी डॉक्टरांना परदेश वारी, महागड्या भेटवस्तू, आणि इतर विविध लाभ दिले जातात. या विक्रीविरोधात 'फेडरेशन ऑफ मेडिकल अँड सेल्स रिप्रेझेंटेटिव्हज असोसिएशन्स ऑफ इंडिया' तर्फे २०२१ मध्ये सर्वोच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. अशा प्रकारच्या औषध विक्रीमुळे सर्वसामान्यांना अवाजवी दराने औषधे खरेदी करावी ▶▶ पान २ वर

### शिस्तभंगाची कारवाई करण्याची तरतूद

सध्याच्या नियमांनुसार औषध कंपन्यांकडून महागड्या भेटवस्तू, परदेश दौरे, आदरातिथ्य किंवा आर्थिक मदत स्वीकारणाऱ्या डॉक्टरांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याची तरतूद आहे. मात्र, या मोफत भेटवस्तू देणाऱ्या औषध कंपन्यांवरच थेट नियंत्रण आणि कायदेशीर कारवाई करण्यासाठी स्वतंत्र कायद्याची गरज आहे का, आणि असल्यास तो कायदा कोणत्या स्वरूपाचा असावा, याचा अभ्यास करण्यासाठी केंद्र सरकारने तीन सदस्यांची उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला असल्याचे मेहता यांनी स्पष्ट केले.

## 'एसआयआर रद्द करा'; ज्ञानेश कुमार, पद सोडा!

### बेंगळुरूत 'कॉकरोच जनता पार्टी'चे आंदोलन; प्रकाश राज, ध्रुव राठी सहभागी; आता चप्पल आंदोलनाची घोषणा

बेंगळुरू । वृत्तसंस्था

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात 'कॉकरोच जनता पार्टी'ने (सीजेपी) गुरुवारी बेंगळुरूतील फ्रीडम पार्क येथे मोठे आंदोलन सुरू केले. 'एसआयआर रद्द करा' आणि 'ज्ञानेश कुमार, पद सोडा' अशा घोषणांनी फ्रीडम पार्क परिसर दणाणून गेला. मतदार याद्यांच्या विशेष पुनरावलोकन प्रक्रियेत कथित अनियमितता झाल्याचा आरोप करत सीजेपीने यावेळी 'जन–न्यायालय' भरविले. या आंदोलनात अभिनेते व सामाजिक कार्यकर्ते प्रकाश राज तसेच युट्युबर ध्रुव राठी सहभागी झाले होते. दरम्यान, या आंदोलनानंतर महिला



पत्रकारांच्या समर्थनार्थ 'चप्पल आंदोलन' करण्याची घोषणा सीजेपीने केली आहे.

गुरुवारी सकाळपासूनच फ्रीडम पार्कमध्ये कार्यकर्ते आणि विविध नागरी संस्थांच्या प्रतिनिधींची गर्दी होऊ लागली होती. दुपारी एकच्या सुमारास सीजेपीचे नेते अभिजीत दीपके, सौरव दास आणि आशुतोष रांका आंदोलनस्थळी दाखल झाले. त्यानंतर ध्रुव राठी आणि प्रकाश राज यांच्यासह त्यांनी व्यासपीठावरून उपस्थितांना अभिवादन केले. यावेळी जमावाकडून केंद्र सरकारविरोधी तसेच 'मतचोर, मतचोर' अशा घोषणा देण्यात आल्या. आंदोलनाला संबोधित करताना अभिनेते प्रकाश राज यांनी निवडणूक आयोगावर जोरदार टीका ▶▶ पान २ वर

## 'भगवान भक्तीगड' व 'नारायणगड' दसरा मेळाव्याकडे महाराष्ट्राचे लक्ष

### एसपी कावत यांच्याकडून दोन्ही गडांवरील नियोजनाची पाहणी; प्रशासकीय यंत्रणा सज्ज





बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक संस्कृतीत दसरा मेळाव्यांना ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. मुंबईतील शिवसेनेचा पारंपरिक दसरा मेळावा आणि नागपूर येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव हेच वर्षानुवर्षे राज्याच्या पटलावर चर्चेत असायचे. मात्र, गेल्या काही दशकांत बीड जिल्ह्याने गडांवरील मेळाव्यांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या राजकारणात एक वेगळीच ओळख निर्माण केली. स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांनी भगवान गडावर सुरू केलेल्या मेळाव्यानंतर आता बीड जिल्ह्यात 'भगवान भक्तीगड विरुद्ध नारायणगड' असा राजकीय व सामाजिक सामना रंगताना दिसत असून, यावर्षी कोणत्या गडावर जनसागर अधिक उसळणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांनी भगवान गडावर सुरू केलेल्या दसरा मेळाव्याला राज्यभरातून लाखो भाविक व कार्यकर्त्यांचा मोठा पाठिंबा मिळायचा. मुंडे साहेबांच्या अकाली निधनानंतर गडाचे महंत नामदेव शास्त्री महाराज यांनी या गडावरील राजकीय सभांना पूर्णविराम दिला. ज्या व्यासपीठावरून मुंडे साहेब गर्जना करायचे ते व्यासपीठ काढून टाकण्यात आले आणि राजकीय मेळावा रद्द करण्यात आला. या घडामोडींमुळे दुखावलेल्या भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी संत भगवान बाबांचे जन्मगाव असलेल्या सावरगाव ▶▶ पान २ वर

### राज्याचे लक्ष गर्दीच्या गणितावर

बीड जिल्ह्यामध्ये गडांचे महत्त्व केवळ आध्यात्मिक नसून त्याला मोठा राजकीय आयामही आहे. यंदाच्या दसऱ्याला भगवान भक्तीगडावरील पंकजा मुंडे यांचा मेळावा की नारायणगडावरील मनोज जरांगे यांच्या उपस्थितीतील मेळावायांपैकी कोणाच्या मेळाव्याला लोकांचा कौल जास्त मिळतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## थोडक्यात...

### हे जन–आंदोलन नसून 'राजकारण'–माजी न्यायाधीश

दिल्ली: मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकन(एसआयआर)प्रक्रियेवरून सुरू असलेल्या विरोधाच्या पार्श्वभूमीवर, २७२ नागरिकांसह उच्च न्यायव्यवस्थेतील ४२ माजी न्यायाधीशांनी एक खुले पत्र जारी केले आहे. या पत्राद्वारे निवडणूक आयोगाला उघड पाठिंबा देण्यात आला असून, लोकशाहीत निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक संस्थांवर वारंवार निराधार प्रश्न उपस्थित केले जाऊ नयेत, असा इशारा देण्यात आला आहे. माजी न्यायाधीशांनी विरोधी पक्षांच्या या विरोधाचे वर्णन एखादे विशिष्ट जनमत तयार करण्याच्या उद्देशाने केलेले राजकारण, असे केले आहे. या विषयावर स्पष्ट मत व्यक्त करताना दिल्ली उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती शिव नारायण धिंग्रा म्हणाले, हा सर्व गदारोळ मतदारांकडून होत नसून, निवडणुका जिंकण्यात अपयशी ठरलेल्या राजकीय पक्षांकडून केला जात आहे.

### देशात अघोषित आणीबाणीसदृश स्थिती – डॉ. उल्हास बापट

पुणे: देशातील लोकशाहीचे स्वरूप संसदीय पद्धतीकडून 'पंतप्रधानकेंद्रित' व्यवस्थेकडे झुकत असून, सध्या अघोषित आणीबाणीसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. निवडणूक आयोगावर सत्ताधाऱ्यांचा दबाव इंदिरा गांधींच्या काळापासून असला, तरी सध्याच्या केंद्र सरकारच्या काळात तो पराकोटीला पोहोचल्याचे मत ज्येष्ठ राज्यघटना अभ्यासक डॉ. उल्हास बापट यांनी व्यक्त केले. काँग्रेस कार्यकर्त्यांच्या वतीने पुण्यात 'निवडणूक आयोगावर गुन्हा दाखल न करण्याचे संरक्षण योग्य आहे का?' या विषयावर आयोजित परिसंवादात ते बोलत होते. ज्येष्ठ नेते उल्हास पवार, कायदेतज्ज्ञ ड. असीम सरोदे यावेळी उपस्थित होते. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस संजय बालगुडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. बापट म्हणाले, मतदानाचा अधिकार आणि निवडणूक प्रक्रियेचे महत्त्व लक्षात घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात निवडणुकांसाठी स्वतंत्र भाग ठेवला. घटना समितीतील चर्चेदरम्यान डॉ. राजेंद्र प्रसाद आणि शिब्बनलाल सक्सेना यांनी भविष्यात पंतप्रधानांकडून निवडणूक आयोगाच्या नियुक्त्यांमध्ये मनमानी होण्याची भीती व्यक्त केली होती. ती भीती आज प्रत्यक्षात उतरताना दिसत असल्याचे बापट यांनी सांगितले.

### सचिन वाझेच्या गाड्यांवरुन हायकोर्टाचे ताशेरे

मुंबई: त्यांचा मासिक पगार किती असेल? एपीआयच्या मालकीची मर्सिडीज आहे?. एखाद्या सहायक पोलीस निरीक्षक (एपीआय) च्या मालकीची मर्सिडीज आहे, ही पोलीस कमिशनर (सीपी) साठी चिंतेची बाब असायला हवी, अशा शब्दांमध्ये गुरूवारी (दि. ८ ऑक्टोबर) मुंबई उच्च न्यायालयाने सहायक पोलीस निरीक्षक (एपीआय) सचिन वाझेवर ताशेरे ओढले. बडतर्फ सहायक पोलीस निरीक्षक सचिन वाझे हा अँटिलिया बॉम्ब संशय प्रकरण आणि मनसुख हिरेन हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी आहे. सध्या तो मुंबईतील तळोजा मध्यवर्ती कारागृहात आहे. त्याच्या जामीन अर्जावर आज मुंबई उच्च न्यायालयात न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठासमोर तब्बल तीन तास सुनावणी झाली. सुनावणीवेळी न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांनी विचारणा केली की, त्यांचा (सचिन वाझे) मासिक पगार किती असेल? यावर वकिलांनी सांगितले की, त्यांना सध्या दरमहा ९० हजार रुपये पगार आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०८ ऑक्टोबर २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १६.५० क्विंटल | २,६५१ | ३,०८१ | २,७९० |
| ज्वारी/हायब्रिड: ११७.५० क्विंटल | २,५०१ | ६,२०० | ४,५७६ |
| मका/लोकल: १.०० क्विंटल | २,३०० | २,३०० | २,३०० |
| तूर: ३०.५० क्विंटल | ९,००० | ९,७०१ | ९,४६० |
| उडीद: १०.५० क्विंटल | ९,२०० | ९,७०० | ९,४८६ |
| बाजरी: २७.०० क्विंटल | २,४५१ | ३,३३१ | २,८१६ |
| मुग: १.५० क्विंटल | ९,३७० | ९,५०० | ९,४४० |
| सोयाबीन: १३७.५० क्विंटल | ६,६०० | ६,८१६ | ६,७५० |
| हरभरा: २.०० क्विंटल | ६,००१ | ७,२९० | ६,५१३ |

cmyk

## अग्रलेख

# 'मेक इन इंडिया' की 'मित्रभांडवलशाही'?

जागतिक स्तरावर तंत्रज्ञान आणि गुंतवणुकीचा महामार्ग भारतात आणण्याचे दावे करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार सध्या एका मोठ्या जागतिक वादाच्या भोवऱ्यात अडकले आहे. अब्जाधीश उद्योगपती आणि स्पेसएक्स चे प्रमुख इलॉन मस्क यांनी भारताच्या सॅटलाईट इंटरनेट क्षेत्रात प्रवेश करण्यास होत असलेल्या विलंबावरून थेट देशातील ''काही धनिकांवर'' आणि अप्रत्यक्षपणे सरकारी यंत्रणेवर गंभीर आरोप केले आहेत. भारताच्या ग्रामीण आणि दुर्गम भागातील जनतेला डिजिटल क्रांतीपासून दूर ठेवणे हा एक ''गुन्हेगारी स्वरूपाचा कट'' आहे, असे मस्क यांनी म्हटले आहे. मस्क यांच्या या 'ओलिगार्की' (धनिकशाही) च्या दाव्यानंतर केंद्रीय दळणवळण मंत्रालयाने हे आरोप फेटाळले असले तरी, या वादाने मोदी सरकारच्या 'इझ ऑफ डुइंग बिझनेस', 'मेक इन इंडिया' आणि जागतिक गुंतवणूक धोरणांचे वस्त्रहरण केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सातत्याने आंतरराष्ट्रीय मंचांवरून टेस्ला आणि स्टारलिंक सारख्या जागतिक कंपन्यांना भारतात येण्यासाठी पायघड्या घातल्या आहेत. मात्र, गेल्या चार ते पाच वर्षांपासून स्टारलिंक केवळ परवाने आणि मंजुरीच्या फाईल्समध्ये अडकून पडली आहे. मस्क यांनी उपस्थित केलेला मुद्दा हा भारतातील नोकरशाही आणि प्रशासकीय दिरंगाईवर बोट ठेवणारा आहे. जर जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तीला भारतात व्यापार सुरू करण्यासाठी एवढा संघर्ष करावा लागत असेल, तर इतर परदेशी गुंतवणूकदारांचे काय होत असेल, हा प्रश्न आता उपस्थित होत आहे. मस्क यांचे हे थेट आरोप मोदी सरकारच्या त्या जाहिरातबाजीला धक्का देणारे आहेत, ज्यामध्ये भारत हा परदेशी गुंतवणुकीसाठी सर्वात सुलभ देश असल्याचे सांगितले जाते. मस्क यांनी लावलेला 'ओलिगार्की' हा शब्द थेट भारतीय उद्योग जगतातील मक्तेदारीकडे निर्देश करतो. भारतातील दूरसंचार क्षेत्र सध्या रिलायन्स जिओ आणि भारती एअरटेल या दोनच बड्या कंपन्यांच्या हातात एकवटलेले आहे, ज्यांचा बाजारपेठेवर ८० टक्क्यांहून अधिक ताबा आहे. मस्क यांच्या आरोपांमुळे विरोधकांच्या त्या दाव्याला बळ मिळाले आहे, ज्यानुसार मोदी सरकार केवळ आपल्या मर्जीतील ठराविक बड्या कॉर्पोरेट मित्रांच्या व्यावसायिक हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी कायदे आणि नियम वाकवत आहे. सॅटलाईट स्पेक्ट्रमच्या लिलावाबाबत जिओ आणि एअरटेलने घेतलेली आक्रमक भूमिका आणि त्यानंतर स्टारलिंकच्या मंजुरीला झालेली दिरंगाई, हे दर्शवते की देशांतर्गत कॉर्पोरेट दबावापुढे सरकार झुकत आहे. सरकारी सूत्रांनुसार, स्टारलिंकला राष्ट्रीय सुरक्षेच्या कारणास्तव अडवण्यात आले आहे, कारण यापूर्वी अंदमान आणि मणिपूरमध्ये काही अनधिकृत स्टारलिंक उपकरणे सापडली होती. परंतु, स्टारलिंकच्या बिझनेस ऑपरेशन्सच्या उपाध्यक्ष लॉरेन ड्रायर यांनी 'इंडिया मोबाईल कॉंग्रेस २०२६' ( २०२६) मध्ये स्पष्ट केले की, त्यांनी भारताच्या सुरक्षेचे सर्व नियम पाळून २० गेटवे साईट्स उभारल्या आहेत आणि भारतीय युजर्सचा डेटा भारतातच राहील अशी व्यवस्था केली आहे. तरीही अंतिम मंजुरी न मिळणे हे संशयास्पद आहे. जेव्हा देशांतर्गत कंपन्यांच्या सॅटलाईट सेवांचा प्रश्न येतो, तेव्हा नियमांची गती वेगळी असते आणि परदेशी स्पर्धकाचा प्रश्न येतो, तेव्हा सुरक्षेचे कारण पुढे करून प्रक्रिया लांबवली जाते, हा तथ्यपूर्ण विरोधाभास मोदी सरकारच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उभा करतो. मोदी सरकार 'डिजिटल इंडिया'चा मोठा गाजावाजा करते, परंतु वास्तव हे आहे की मे २०२६ पर्यंत भारतातील ११,२५६ हून अधिक गावांमध्ये अजूनही ४जी (४) कनेक्टिव्हिटी पोहोचलेली नाही. ग्रामीण भागात इंटरनेटची घनता शहरी भागाच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. स्टारलिंकसारखे सॅटलाईट इंटरनेट दुर्गम भागात स्वस्त आणि वेगवान इंटरनेट देऊ शकते, जे पारंपरिक टॉवर्सच्या माध्यमातून शक्य नाही. मात्र, अंतर्गत कंपन्यांची मक्तेदारी टिकवून ठेवण्याच्या नादात सामान्य भारतीय ग्राहकांना आधुनिक तंत्रज्ञानापासून वंचित ठेवले जात आहे. मस्क विरुद्ध मोदी सरकार हा वाद केवळ एका परदेशी कंपनीच्या परवान्यापुरता मर्यादित नाही. हा वाद भारताच्या आर्थिक धोरणांमधील प्रामाणिकतेचा आहे. एकीकडे मस्क यांना भारतात आणण्यासाठी आतुर असलेले पंतप्रधान मोदी आणि दुसरीकडे देशांतर्गत बड्या कॉर्पोरेट मित्रांचे व्यावसायिक साम्राज्य वाचवण्याची धडपड, या दुटप्पी भूमिकेमुळे भारताची जागतिक पत घसरत आहे. राष्ट्रीय सुरक्षेचा आडोसा घेऊन जर मित्रभांडवलशाहीचे रक्षण केले जात असेल, तर ते 'मेक इन इंडिया'च्या मूळ संकल्पनेचा पराभव करणारे आहे. सरकारने आपल्या धोरणांमध्ये पारदर्शकता आणून ही कोंडी फोडण्याची तातडीने गरज आहे.

# सामाजिक उत्तरदायित्वाचा निधी प्रदूषण नियंत्रणासाठी वापरावे-पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे

## जालन्यातील उद्योगांनी प्रदुषण नियंत्रण यंत्रणांमध्ये कालबद्धपद्धतीने सुधारणा करावी

**मुंबई । प्रतिनिधी**

**जालना शहरालगतच्या औद्योगिक वसाहतीतील प्रदूषण नियंत्रणासाठी लोखंड उत्पादन व भंगार पुनर्प्रक्रिया उद्योगांनी प्रदुषण नियंत्रण मंडळाने सुचविलेल्या उपाय योजनांचा स्वतंत्र कृती आराखडा तयार करून त्याच्या अंमलबजावणीसाठी लघु, मध्यम व दीर्घ मुदतीची कालमर्यादा निश्चित करावी. तसेच प्रदुषण नियंत्रणासंदर्भातील जुन्या यंत्रणा बदलून कालबद्ध पद्धतीने नवीन प्रदूषण नियंत्रण यंत्रणा अद्ययावत कराव्यात, असे निर्देश पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी आज दिले. तसेच कंपन्यांनी आपल्या सामाजिक उत्तरदायित्वाचा निधीचा वापर प्रदुषण कमी करण्यासाठी प्राधान्याने करावा, अशी सूचनाही त्यांनी यावेळी केली.**



जालना शहरालगतच्या औद्योगिक वसाहतीतील वाढत्या प्रदूषणाच्या प्रश्नावर पर्यावरणमंत्री तथा पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी उद्योग प्रतिनिधी आणि संबंधित अधिकाऱ्यांची आज मंत्रालयातील दालनात बैठक घेतली. यावेळी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव राहुल रेखावार यांच्यासह जालनातील स्टिल उद्योगांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जालना औद्योगिक परिसरातील अनेक उद्योगांचे प्रकल्प जुने असून लोखंड व स्क्रॅपच्या प्रक्रियेमुळे धूर आणि धूलिकण निर्माण होत आहेत. जुन्या यंत्रणा, अपुरी धूरशोषण व्यवस्था, उद्योग परिसरातील अंतर्गत रस्त्यांवरील धूळ, स्क्रॅप हाताळणी तसेच प्रदूषण नियंत्रण यंत्रणेला बायपास करून होणाऱ्या उत्सर्जनासारख्या बाबींवर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, प्रदूषणाचा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवता येणार नाही. उद्योग बंद करणे हा अंतिम उपाय नसून उद्योगांनी आपल्या नफ्यातील काही हिस्सा तंत्रज्ञानाच्या आधुनिकीकरणासाठी खर्च करणे आवश्यक आहे. जुन्या उत्पादन पद्धती आणि यंत्रणांमुळे या भागातील धूर प्रदूषणाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. या उद्योगांची यापूर्वी प्रत्यक्ष पाहणी करून उद्योग प्रतिनिधींशी सविस्तर चर्चा करण्यात आली होती. त्यानंतर उद्योगांसमोर प्रदूषण नियंत्रणासाठी काही प्रमुख उपाययोजना ठेवण्यात आल्या. स्क्रॅपचे आकारमान कमी करून त्याचा नियंत्रित व सातत्यपूर्ण पुरवठा करण्याची यंत्रणा उभारणे, उत्पादन विभागातील अनावश्यक उघडी जागा बंद करणे, शेडमध्ये योग्य प्रेशर राखणे, धूरशोषणासाठी प्राथमिक व दुय्यम हूडची कार्यक्षमता वाढविणे आणि योग्य धूळ व वायुप्रदूषण नियंत्रण यंत्रणा उभारणे, या उपाययोजनांवर भर देण्यात आला आहे. तांत्रिक किंवा जागेच्या मर्यादांमुळे एखादी उपाययोजना शक्य नसल्यास उद्योगांनी तज्ज्ञ संस्थांकडून व्यवहार्य पर्याय निश्चित करून प्रदूषण नियंत्रण प्राधिकरणाची मान्यता घ्यावी, अशी सूचनाही त्यांनी यावेळी केली. प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रत्येक उद्योगाची स्वतंत्र पाहणी व लेखापरीक्षण करावे. धूरगळती, नादुरुस्त यंत्रणा, प्रक्रिया शेडमधील उघड्या जागा, प्रदूषण नियंत्रण प्रणालीला वगळणारे मार्ग आणि धूळ नियंत्रणातील त्रुटी यांची उद्योगनिहाय नोंद करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करावा. या अहवालाच्या आधारे प्रत्येक उद्योगाला स्वतंत्र उपाययोजना आणि कालमर्यादा देण्यात येईल, असे मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले. मंडळाने दिलेल्या कालावधीत उद्योगांनी केलेल्या प्रत्यक्ष प्रयत्नांचा विचार पुढील निर्णय घेताना केला जाईल. कामात ठोस प्रगती दिसल्यास आवश्यकतेनुसार मुदतीबाबत विचार केला जाईल; मात्र कोणतीही प्रगती न करणाऱ्या उद्योगांना मुदतवाढ दिली जाणार नाही. अंतर्गत रस्त्यांचे मजबुतीकरण, पाण्याचे फवारे आणि वाहनांच्या चाकांमधून पसरणारी धूळ रोखण्यासाठी आवश्यक व्यवस्था तातडीने करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. उद्योगांनी केलेल्या उपाययोजना आणि प्रत्यक्ष प्रगतीचा आढावा घेण्यासाठी महिनाभरानंतर पुन्हा बैठक घेण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

### सीएसआरचा निधी प्रदूषण नियंत्रणासाठी करा

औद्योगिक संस्थांच्या सीएसआर निधीचा वापर प्रदूषण कमी करण्यासाठी करण्यावरही बैठकीत भर देण्यात आला. केवळ विविध कार्यक्रम, स्पर्धा किंवा इतर उपक्रमांवर निधी खर्च न करता, विद्यमान प्रदूषण कमी करण्यासाठी आवश्यक यंत्रणा, पर्यावरणपूरक उपक्रम, जलसंधारण आणि परिसर सुधारणा यावर सीएसआरचा निधी वापरण्याचे आवाहन मुंडे यांनी केले. औद्योगिक परिसरातील खराब रस्त्यांमुळे उडणारी धूळ कमी करण्यासाठी रस्ते सुधारणा, मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड, जलसंधारण, नदी-नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण, तसेच नागरिकांच्या आरोग्यासाठी श्वसनविषयक आरोग्य तपासणी शिबिरे घेण्यात यावीत, असेही त्यांनी यावेळी सांगितले. प्रदुषण कमी करण्यासाठी काही उद्योगांनी आयआयटी मुंबई, आयआयटी दिल्ली आणि आयआयटी कानपूरमधील तज्ज्ञांशी चर्चा सुरू असल्याचे उद्योग प्रतिनिधींनी यावेळी सांगितले. काही उद्योगांमध्ये धूरशोषण यंत्रणेच्या क्षमतेत वाढ आणि दुय्यम हूडच्या आधुनिकीकरणाचे काम सुरू असून, काही कामे फेब्रुवारी-मार्चपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचेही सांगण्यात आले.

# जालन्यात ५० व्यक्तीची फसवणूक एका वर्षात तिनपट रक्कम देण्याचे आमीष दाखवुन अपहार करणारे आरोपी जेरबंद

**जालना । प्रतिनिधी**

**शहरातील शेरसवार नगर येथील तक्रारदार मोहम्मद फेरोज अब्दुल सत्तार व्यवसाय शीक्षक यांचेसह त्यांचे भाऊ व त्यांचे जवळचे ५० गुंतवणुकदारांकडुन यां कपनीमध्ये गुंतवणुक केल्यास वर्षाला तीनपट रक्कम करुन देण्याचे आमीष देवुन फसवणुक करणाऱ्या टोळीतील तीन आरोपी विरुध्द दिनांक ०३/१०/२०२६ रोजी पोलीस ठाणे कदिम जालना येथे गुन्हा कायद्या प्रमाणे यातील तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारी वरुन गुन्हा नोंद करण्यात आलेला असुन गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधीक्षक यांचे आदेशान्वये आर्थीक गुन्हे शाखा जालना हे करत आहेत.**

तक्रारदार यांचेसह इतर व्यक्तींचे १,३२,०५,०००/- रुपये रक्कमेची फसवणुक करुन फरार असलेल्या आरोपींचा शोध पोलीस घेत असताना मिळालेल्या माहीती नुसार यातील दोन आरोपींच्या मुसक्या आवळण्यात आर्थीक गुन्हे पोलीसांना यश आले आहे. आरोपी वसिम अहेमद अब्दुल गफार वय ३७ वर्षे रा. इतवार गल्ली, कचेरी रोड जुना जालना यास तर मोहम्मद युनुस अहेमद मोहम्मद सलीम वय ३४ वर्षे रा. रा. इतवार गल्ली, कचेरी रोड जुना जालना यास जुना जालना भागातुन पोलीसांनी अटक केली आहे. गुन्हयातील मुख्य सुत्रधार आरोपी फरार असुन त्याचा शोध पोलीसांचे दोन पथके घेत आहेत. अटक आरोपींना आज दिनांक ०८/१०/२०२६ रोजी मा.विशेष न्यायालय कोर्ट जालना यांचे समक्ष हजर केले असता तपासकामी आरोपींची ०५ दिवसांची पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केली आहे. गुन्हयातील आरोपीतांनी कंपनीमध्ये गुंतवणुक करणाऱ्या गुंतवणुकदारांना वर्षाकाठी तीनपट रक्कम करुन देण्याचे आमीष देवुन गुन्हा केलेला असल्याने त्यामध्ये गुंतवणुकदारांची संख्या वाढण्याची शक्यत असुन ज्यांनी कोणी या कंपनीमध्ये आरोपींच्या आमीषाला बळी पडुन गुंतवणुक केली असेल त्यांनी आर्थीक गुन्हे शाखा जालना येथे येवुन तक्रारी अर्ज सादर करण्याचे अवाहन केले आहे. सदरची कामगीरी ही मा. श्री तेघबिरसिंह संधु पोलीस अधीक्षक , श्री विक्रम साळी, अपर पोलीस अधीक्षक , श्री बाळासाहेब पवार, पोलीस उपअधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा जालना, यांचे मार्गदर्शनाखाली श्री मिथुन घुगे स.पोलीस निरीक्षक, श्री शैलेश म्हस्के पोलीस उप निरीक्षक, पोलीस अंमलदार गोकुळसींग कायटे, समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण, विष्णु कोरडे, ज्ञानेश्वर खुने, श्रेयस वाघमारे, मंगेश पोपळघट, महीला अमलदार मंदा नाटकर यांनी पार पाडली.

# संवेदनशील मनाचा 'नटसम्राट' हरपला

## ना.पंकजाताई मुंडे व्यक्त केल्या शोकभावना

**मुंबई । प्रतिनिधी**

**चित्रपट सृष्टीतील हरहुन्नरी अभिनेता नाना पाटेकर यांच्या निधनाने संवेदनशील मनाचा नटसम्राट हरपला आहे अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आपल्या शोकभावना व्यक्त करत नानांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.**

प्रसिध्द अभिनेते नाना पाटेकर यांचे दुःखद निधन मनाला चटका लावून गेले. आपल्या दमदार अभिनयाने चित्रपट सृष्टीत त्यांनी एक वेगळी ओळख निर्माण केली होती. केवळ अभिनय क्षेत्रातच नव्हे तर सामाजिक क्षेत्रातही नाना अग्रेसर होते. नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून जलसंवर्धनाची मोठी चळवळ उभा करून त्यांनी योगदान दिले. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियाच्या मदतीला धावून जाणारा या संवेदनशील मनाच्या व्यक्तिमत्वाला माझी भावपूर्ण श्रद्धांजली अशा शब्दांत ना. पंकजाताईंनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्याकडून लाच घेताना तलाठी पकडला

**जालना । प्रतिनिधी**

**दुष्काळग्रस्त शेतकऱ्याकडून तलाठी यांनी लाच स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना यांच्या जाळ्यात अडकले.**

भाऊसाहेब जगन्नाथ गवारे, वय ४२ वर्ष, नौकरी-ग्राम महसूल अधिकारी, नेमणूक सजा रोहिना (यू) तहसील कार्यालय परतूर (वर्ग ३) राहणार घर क्रमांक २३, शिक्षक कॉलनी, श्रीकृष्ण रुख्मिणी नगर, नवीन मोंढा रोड, भोकरदन नाका, जालना तक्रारदार रोहिणा खुर्द येथील गट क्रमांक १०४ मधील ४४ आर शेत जमीन शेतकरी यांचे कडून विकत घेण्याचे ठरवून तशी १००/-रु चे बाँडवर इसारपावती करून घेतली आहे. नमूद शेतीचे मूळ मालक याचे सातबारा इतर अधिकारात असलेली नावे दुरुस्त करणेसाठी भाऊसाहेब गवारे यांची तक्रारदार यांनी जालना येथे भेट घेतली असता त्यांचे काम करण्यासाठी तलाठी भाऊसाहेब गवारे यांनी ५०,०००/- द्यावे लागतील असे सांगितले. अशा आशयाची लेखी तक्रार तक्रारदार यांनी दि.०६/१०/२०२६ रोजी ला.प्र.वि.जालना कडे तक्रारीची पडताळणी दिली. दि.०६/१०/२०२६ रोजी तक्रारदार पंचासह परतूर येथे लोकसेवक यांचे खाजगी कार्यालयात गेले असता तलाठी भाऊसाहेब गवारे व तक्रारदार यांची भेट झाली. सदर कामासाठी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे ५०,०००/- रू लायेची मागणी करून स्वीकारण्याचे कबुल केल्याचे लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान निष्पन्न झाले. सापळा कार्यवाही आस्था हॉस्पिटल, भोकरदन नाका जालना येथे तक्रारदार यांचेकडून पंचासमक्ष ५०,०००/- रू लाच घेताना लोकसेवक भाऊसाहेब गवारे यांना त्यांचे खाजगी कार मध्ये सापळा पथकाने लाचेचे रकमेसह ताब्यात घेतले. पोलिस ठाणे सदर बाजार जिल्हा जालना येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला सापळा अधिकारी श्री. बी. एस. जाधवर, पोलीस उप अधीक्षक ला. प्र. वि. जालना . सापळा पथक १) पो.ह. गजानन घायवट २) पोअं/मनोहर भुतेकर ३) संदीप लहाने ४) शिबलिंग खुळे ५) गणेश चेके ६) चा.पो.ह. बिनोरकर

## पान १ वरून...

### शेतकरी प्रश्नांवर किसान

जनवादी महिला संघटनेच्या प्राची हातिवलेकर, विद्यार्थी नेते नवनाथ मोरे आणि शेतमजूर युनियनचे साहेबराव कसबे यांनी अधिवेशनाला शुभेच्छा दिल्या. आमदार विनोद निकोले यांनी अधिवेशनाला संबोधित केले. कॉंग्रेसचे आमदार सतेज पाटील आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनीही अधिवेशनाला भेट दिल्याचे किसान सभेने सांगितले.

----------

### मराठवाड्यासह विदर्भातील

'नाम' फाऊंडेशन उभारले. शेतकऱ्यांचे अश्रु पुसण्याचे काम त्यांनी केले. प्रसिद्धीच्या झोतात असतानाही त्यांनी सामाजिक भान जपले. त्यांच्या या कृतीचे कौतुक झाले. दहा वर्षांपूर्वीच्या दुष्काळात नाम फाऊंडेशनची स्थापन झाली. सप्टेंबर २०१५ मध्ये ही चळवळ सुरू झाली. नाना आणि मकरंद या दोन नावातील अद्याक्षरं घेऊन 'नाम' फाऊंडेशन शेतकऱ्यांच्या मदतीला उतरले. मराठवाडा आणि विदर्भातील भीषण दुष्काळाने अनेकांचे सर्वस्व हिरावले होते. शेतकरी आत्महत्येचा डाग प्रगतशील आणि पुरोगामी महाराष्ट्रावर लागलेला होता. शेतकऱ्यांच्या विधवांच्या, मुलांच्या हार्त हाकेला नाम फाऊंडेशनने मदत केली. पण केवळ आर्थिक मदतीपुरती ही चळवळ मर्यादित राहिली नाही. पाणी संवर्धन, पाणी अडवा, पाणी जिरवा, पाणी व्यवस्थापन, शेतकरी मार्गदर्शन, विविध पाणी प्रकल्पांवर काम, महिलांना स्वत:च्या पायावर उभा राहता यावे यासाठीचा प्रयत्न आणि मुलांना चांगले शिक्षण मिळवून देण्यासाठी नाम झटली आणि हे काम सुरू आहे. नाम ही केवळ एक संस्था न राहता चळवळ झाली. नाना पाटेकर यांनी या काळात मराठवाड्यातील विविध ठिकाणी भेटी दिल्या. विदर्भातील यवतमाळमध्ये ते गेले. त्यांनी अनेक मुलाखतीत हे विदारक चित्र मांडले आणि थेट मदत करण्याचे आवाहन केले. सद्या सुपर अल निनोमुळे महाराष्ट्रावर दुष्काळाचे भीषण सावट उभे ठाकले आहेत. ऐन हिवाळ्यातच पाणवठे आटायला सुरुवात झाली आहे. राज्यातील जवळपास सर्वच तालुके भीषण दुष्काळाचे चटके सहन करत आहेत. अशावेळी अनेकांना नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांची आठवण झाली आहे. पण काळाने नानांना आपल्यातून हिरावले आहे. मराठवाड्यासह विदर्भातील अनेक कुटुंब पोरकी झाली आहेत.

-----------

### अभिनयाचा बुलंद

असल्याची माहिती समोर आली. 'नानाची वाडी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या याच फार्महाऊसमध्ये नाना पाटेकर अनेक वर्षांपासून कुटुंबासह राहत होते. डोणजे येथील हे फार्महाऊस त्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचे ठिकाण होते.

-----------

### 'एसआयआर रद्द करा'; ज्ञानेश

केली. निवडणूक आयोगाने एसआयआर प्रक्रियेद्वारे संपूर्ण देशाचा अपमान केला असल्याचा आरोप त्यांनी केला. सरकार कोण स्थापन करणार हे ठरविण्याचा अधिकार जनतेचा आहे; मात्र एसआयआरमुळे आता मतदान कोण करणार, हेच सरकार ठरवत असल्याचा गंभीर आरोप प्रकाश राज यांनी केला. २० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील १३ कोटींहून अधिक लोकांना मतदार यादीतून वगळण्यास कारणीभूत ठरलेली एसआयआर प्रक्रिया रद्द करण्याची मागणी त्यांनी केली. हे आंदोलन केवळ मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटविण्यासाठी नसून नागरिकांचे मतदानाचे अधिकार पुनर्स्थापित करण्यासाठी असल्याचे प्रकाश राज यांनी स्पष्ट केले. 'ज्ञानेश कुमार गेले तरी त्यांच्या जागी दुसरी व्यक्ती येईल. त्यामुळे व्यक्ती बदलणे हा आमचा उद्देश नाही. एसआयआर प्रक्रिया रद्द करणे हाच खरा उद्देश आहे,' असे त्यांनी सांगितले. ज्ञानेश कुमार हे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या सांगण्यावरून काम करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी मतदार यादीतून नावे वगळण्यात आलेल्या नागरिकांच्या अनुभवांना या जन-न्यायालयात व्यासपीठ दिले. एकाच ठिकाणी राहत असूनही अनेक नागरिकांना मतदार यादीत 'स्थलांतरित' किंवा 'अनुपस्थित' म्हणून दाखविण्यात आल्याचा दावा सीजेपीने केला. 'जिवंत असलेल्या लोकांना मृत घोषित केले जाते. ही लोकशाहीची हत्या आहे,' असा आरोप अभिजीत दीपके यांनी केला. 'आम्हाला तरुणांना झुरळ म्हणतात, कारण त्यांना आपण झुरळासारखे जगावे असे वाटते. मात्र झुरळासारखेच आपण कणखर राहिले पाहिजे,' असेही दीपके म्हणाले. या आंदोलनात सहभागी झालेल्या युट्युबर ध्रुव राठी यांनी कर्नाटकातील १०० मतदान केंद्रांवरील एसआयआर प्रक्रियेतील कथित अनियमिततेवर आधारित अहवालही प्रसिद्ध केला आहे. एसआयआर प्रक्रियेबाबत निवडणूक आयोगाकडून पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाचा अभाव असल्याचा आरोप त्यांनी केला. 'मी येथे सत्तांतर घडवून आणण्यासाठी आलेलो नाही,' असे राठी यांनी यावेळी स्पष्ट केले. त्यांच्या मते, हा लढा लोकशाहीच्या संरक्षणासाठी आहे. दरम्यान, जन-न्यायालयानंतर सीजेपीकडून महिला पत्रकारांच्या समर्थनार्थ 'चप्पल आंदोलन' केले जाणार आहे. ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात सीजेपीने आयोजित केलेले हे अलीकडील दुसरे मोठे आंदोलन आहे. यापूर्वी मुंबईतील शिवाजी पार्क येथे झालेल्या आंदोलनात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.

--------------

### महागड्या औषधांवरून सर्वोच्च न्यायालयाची

लागतात, असा युक्तिवाद याचिकेत करण्यात आला होता. तसेच अशा बेकायदेशीर कृतींसाठी थेट औषध कंपन्यांनाच जबाबदार धरण्यात यावे आणि त्यांच्यासाठी कठोर नियमावली लागू करण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली होती. याआधी झालेल्या सुनावणीदरम्यान सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला माहिती दिली होती की, औषध कंपन्यांच्या अनैतिक पद्धतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी कायदेशीर आराखड्याची खरोखर गरज आहे का, याची सखोल तपासणी करण्यासाठी केंद्र सरकार तीन सदस्यांची समिती स्थापन करणार आहे. सॉलिसिटर जनरल यांच्या या निवेदनानंतर न्यायालयाने आपला निर्णय राखून ठेवला होता, जो आज जाहीर करण्यात आला. याप्रकरणी झालेल्या सुनावणीदरम्यान केंद्र सरकारची बाजू मांडताना सॉलिसीटर जनरल तुषार मेहता यांनी १७ ऑगस्ट २०२६ रोजी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राचा संदर्भ दिला. औषध निर्माण विभाग, आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभाग तसेच कायदे मंत्रालयामध्ये या विषयावर सविस्तर चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले. ही समिती पुढील दोन महिन्यांत आपला अहवाल सादर करेल आणि त्यानंतर सरकार अंतिम निर्णय घेईल, तोपर्यंत युसीपीएमपी कोड लागू राहील, असे सरकारकडून सांगण्यात आले. मात्र, याचिकाकर्त्यांनी यावर तीव्र आक्षेप घेतला आहे. याचिकाकर्त्यांतर्फे ज्येष्ठ वकील संजय पारिख यांनी युक्तिवाद केला की, सरकारने २०२२ मध्येच अशा प्रकारच्या कायदेशीर यंत्रणेसाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली होती, मग पुन्हा नवीन समिती कशासाठी, असा सवाल याचिकाकर्त्यांनी उपस्थित केला. मोफत भेटवस्तू स्वीकारणाऱ्या डॉक्टरांवर दंडात्मक कारवाईची तरतूद आहे, परंतु अशा प्रलोभने दाखवणाऱ्या औषध कंपन्यांना शिक्षा करण्यासाठी कोणताही कायदेशीर टप्पा उपलब्ध नाही. या त्रुटीचा फायदा घेऊन औषध कंपन्या डॉक्टरांच्या औषध चिठ्ठ्यांवर प्रभाव पाडतात. त्यामुळे न्यायालयाने सरकारला कायदेशीर चौकट तयार करण्याचे निर्देश द्यावेत किंवा मार्गदर्शक तत्त्वे जारी करावीत, अशी मागणी त्यांनी केली.

---------------

### 'भगवान भक्तीगड' व 'नारायणगड'

येथे 'भगवान भक्तीगडा'ची उभारणी केली आणि दसरा मेळाव्याची परंपरा अविरत चालू ठेवली. दुसरीकडे, बीडमधील गडांच्या राजकारणात नारायणगडाचा दसरा मेळावाही ऐतिहासिक ठरतो. तत्कालीन शिवसेना आमदार प्रा. सुनील धांडे यांनी स्वतःच्या पक्षाचा मुंबईत मेळावा असतानाही नारायणगडावर दसरा मेळाव्याची सुरुवात केली होती. काही काळानंतर या परंपरेत खंड पडला होता. मात्र, मराठा आरक्षणाच्या आंदोलनाची धग निर्माण झाल्यानंतर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या माध्यमातून नारायणगडाच्या विश्वस्तांनी पुन्हा एकदा दसरा मेळावा मोठ्या ताकदीने भरवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता ओबीसी-मराठा शक्तीप्रदर्शन आणि राजकीय संघर्षाच्या पार्श्वभूमीवर नारायणगडावरील मेळावा अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. दसरा मेळाव्यांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी बीड पोलीस दल पूर्णपणे सतर्क झाले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी स्वतः दोन्ही गडांवर प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. भगवान भक्तीगड (सावरगाव): पोलीस अधीक्षक कावत यांनी सावरगाव येथे भेट देऊन सुरक्षा व्यवस्था व वाहतूक नियोजनाचा आढावा घेतला. यावेळी सावरगावचे सरपंच संदेश सानप, संतोष राख यांच्यासह शिष्टमंडळ आणि पदाधिकाऱ्यांशी चर्चा करत मेळाव्याच्या रूपरेषेची माहिती घेतली. यापूर्वी त्यांनी नारायणगडाला भेट देत मेळाव्याचे ठिकाण, भाविकांची येण्या-जाण्याची सोय आणि वाहनतळाची पाहणी केली होती. यावेळी गडाचे महंत शिवाजी महाराज बळीराम गवते अनिल जगताप दिलीप गोरे व विश्वस्तांशी चर्चा करून सुरक्षेच्या अनुषंगाने महत्त्वाच्या सूचना दिल्या.

-------------

## थोडक्यात




### विदर्भ-मराठवाडा दुग्धविकास प्रकल्पांतर्गत लाभार्थींना अनुदानावर मुरघास, कडबा कुट्टी मशीनचे वाटप

पाटोदा । प्रतिनिधी

विदर्भ व मराठवाडा दुग्धविकास प्रकल्पांतर्गत पाटोदा तालुक्यातील मेंगडेवाडी व वाघिरा येथे ७ ऑक्टोबर रोजी लाभार्थींना विविध स्वरूपाचे चारा व पशुपालन साहित्य वाटप करण्यात आले.

मा. जितीन रहमान, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड, डॉ. संजय गोरानी, प्रकल्प संचालक, विदर्भ व मराठवाडा दुग्धविकास प्रकल्प, डॉ. शितल कुमार मुकणे, अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन, डॉ. सचिन संकपाल, पशुपोषण तज्ज्ञ एनडीडीबी तसेच डॉ. आर.डी. कदम, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय यांच्या हस्ते हे वाटप झाले.

यावेळी ७० लाभार्थींना ३१.५ टन मुरघास, ३ लाभार्थींना कडबा कुट्टी मशीन, तर ६३ लाभार्थींना प्राथमिक स्वरूपात चारा बियाणे देण्यात आले. तसेच १० लाभार्थींना क्ऋचचा लाभ मंजूर करण्यात आला. वंधत्व निवारण कार्यक्रमासाठी उपयुक्त थहळींश डळवश ढशीीं प्रातिनिधिक स्वरूपात २० पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना देण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी प्रकल्पाच्या कामकाजाची माहिती जाणून घेत समाधान व्यक्त केले. अल निनोच्या पार्श्वभूमीवर विभागाने शेतकऱ्यांना प्रत्यक्ष फिल्डवर जाऊन जास्तीत जास्त मदत व मार्गदर्शन करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.



### पिंपळवंडी शाळेने ज्ञानदानासोबत निसर्गरक्षण केले-घोडके

पिंपळवंडी : जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा पिंपळवंडी येथे वन्यजीव सप्ताह निमित्त वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल घोडके यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी शाळेतील नारळ,वड,पिंपळ वृक्ष लागवडीची परसबागेची पाहणी केली.यावेळी वन अधिकारी अमोल घोडके यांनी सांगितले की,आज वृक्षसंगोपन काळाची गरज आहे.प्राचीन काळापासून वड,पिंपळ,उंबर या झाडांना खूप महत्त्व आहे.या वृक्षामुळे सर्वत्र भरपूर पाऊस पडतो.हेच वृक्ष संगोपनाचे कार्य आता या शाळेतील शिक्षक करीत आहेत.त्यांनी शेणखत,सुपीक माती,शाळेतील अजित पवार मैदानात वाफे तयार करून सेंद्रिय भाजीपाला लागवड केली आहे.या भाजीपाल्यातून दररोज खिचडी आहार विद्यार्थ्यांना दिला जातो. आपण सर्वांनी झाडांसोबत गाय, म्हैस,बैल व डोंगररांगेतील प्राण्यांची काळजी घेतली पाहिजे. झाडांमुळे आपल्याला सावली,फळे,इमारत,लाकूड,इंधन व शुद्ध हवा मिळत आहे.त्याचसोबत गोमातेच्या दुधाने मानवी आरोग्य तर शेणखताने जमिनीचे आरोग्य चांगले राहते.या शाळेतील शिक्षक मेहनती असल्याने शाळेची गुणवत्ता वाढली आहे.शिक्षकांनी ज्ञानदानासोबत युवक व महिला बचत गटाच्या श्रमदानातून वृक्षसंगोपन केले आहे.विविध वृक्षांचे संगोपन करून निसर्गरक्षण झाले आहे.या शाळेसाठी आपण सहकार्य करू असे सांगितले.यावेळी वनरक्षक राठोड,परजणे,सानप, एस.पी.शेळके,श्रीमती पवार,संतोष पवार,बेद्रे,शहादेव पवार,विजय जाधव,जिजाबा पवार,पोपट पवार, कार्यशील मुख्याध्यापक शहाजी येवले,सहशिक्षक भाऊसाहेब पवार,एस.आर.पवार,नारायण नरसाळे,पांडुरंग लटपटे,सौ.वर्षा होळकर,कुशवर्ता पोकळे,युवा कार्य प्रशिक्षक समृद्धी पटवा व गावकरी विद्यार्थी हजर होते.

# पाण्याचा प्रत्येक थेंब जतन करा- जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

## जिल्ह्यातील पाणीटंचाई व स्वच्छता आढावा बैठक संपन्न

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात आगामी काळात पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी प्रशासनाने तयारी सुरू केली असून, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालय सभागृहात जिल्ह्यातील सर्व नगरपालिकांच्या मुख्याधिकाऱ्यांची महत्त्वाची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत नगर प्रशासन अधिकारी संभाजी वाघमारे प्रामुख्याने उपस्थित होते. बैठकीत जिल्ह्यातील पाणीटंचाईची सद्यस्थिती, पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन, तसेच शहरांमधील स्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीत पाणीटंचाई निवारणासाठी तातडीने उपाययोजना राबवण्याबाबत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सूचना दिल्या. पाणीपुरवठ्यासाठी लागणाऱ्या निधीचा प्रस्ताव तातडीने जिल्हा नियोजन समितीकडे सादर करावा, जेणेकरून वेळेवर कामे मार्गी लावता येतील, असे त्यांनी स्पष्ट केले. सध्याच्या सद्यस्थितीनुसार जिल्ह्यातील पाटोदा आणि आष्टी या दोन नगर परिषद क्षेत्रांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. यामध्ये पाटोदा येथे १७ टँकर्सच्या माध्यमातून ३३ फेऱ्या सुरू असून याद्वारे १६,८०० लोकसंख्येची तहान भागवली जात आहे, तर आष्टी येथे २० टँकर्सच्या माध्यमातून



४० फेऱ्या सुरू असून याद्वारे २०,००० लोकसंख्येला पाणीपुरवठा केला जात आहे. अशाप्रकारे दोन नगरपरिषदांमध्ये एकूण ३७ टँकर्सच्या माध्यमातून ७४ फेऱ्या सुरू असून एकूण ३६,८०० नागरिकांना टँकरने पाणीपुरवठा होत आहे. तसेच याशिवाय जिल्ह्यात १ ठिकाणी विहीर/बोअरवेल अधिग्रहित करण्यात आली आहे. टंचाईग्रस्त भागात पाण्याचा सुरळीत पुरवठा करण्यासाठी सार्वजनिक आणि खासगी बोअरवेल अधिग्रहित करण्यात याव्यात, अशी सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी केली. या संपूर्ण मोहिमेत पोलीस, सिंचन, कृषी आणि महसूल या सर्व विभागांनी परस्परांशी समन्वय साधून संयुक्तरीत्या काम करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.या बैठकीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना आवाहन केले आहे. ज्या दिवशी आपल्या भागात नळाद्वारे पाणीपुरवठा केला जातो, त्या पाण्याचा पुरेपूर वापर करावा, पाणी वाया जाऊ देऊ नका आणि पाण्याचा एक-एक थेंब जतन करा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच, शहरांमध्ये आर.ओ. (ठज) आणि फिल्टर वॉटर वितरित करणाऱ्या व्यावसायिक वॉटर सप्लायर्सनाही सूचना देण्यात आल्या आहेत. फिल्टर प्रक्रियेनंतर वाया जाणारे सांडपाणी (वेस्ट वॉटर) तसेच इतर सांडपाणी फेकून न देता, त्याचा योग्य पर्यायी वापर कसा होईल यासाठी संबंधित यंत्रणांनी व सप्लायर्सनी उपाययोजना कराव्या, असे सांगण्यात आले. जिल्ह्यातील उपलब्ध सर्व जलसाठे आता केवळ पिण्यासाठीच आरक्षित करण्यात आले असून, पाण्याचा इतरत्र होणारा दुरुपयोग टाळावा, ही काळाची गरज आहे आणि यासाठी नागरिकांनीही आपली समजूतदारी दाखवावी, अशी अपेक्षा जिल्हाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. पाणीटंचाईच्या मुद्द्यासोबतच बैठकीत शहरांमधील स्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापनावरही चर्चा झाली. घनकचऱ्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी सर्व नगरपालिकांच्या मुख्याधिकाऱ्यांनी मोहीम राबवावी आणि स्वच्छतेबाबत योग्य ती काळजी घ्यावी, असे सांगत जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व मुख्याधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

## ॲड. भास्करराव उजगरे यांची राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या बीड जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती

वडवणी । प्रतिनिधी

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाची बीड जिल्ह्यातील संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने वडवणी येथील प्रसिद्ध विधिज्ञ ड. भास्करराव उजगरे यांची पक्षाच्या बीड जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. बीड येथील संघर्षयोद्धा जनसंपर्क कार्यालयात जिल्हाध्यक्ष श्री. राजेंद्र तुकाराम मस्के यांच्या हस्ते त्यांच्या नियुक्तीची घोषणा करण्यात आली.

ड. भास्करराव उजगरे यांनी यापूर्वी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे बीड जिल्हा संघटक म्हणून जबाबदारी सांभाळताना पक्षाची भूमिका जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रभावीपणे काम केले आहे. संघटनात्मक कामाचा प्रदीर्घ अनुभव, कायद्याचे सखोल ज्ञान



तसेच सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेण्याची त्यांची कार्यपद्धती यामुळे पक्षाने त्यांच्यावर पुन्हा एकदा महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे.

नियुक्तीनंतर बोलताना ड. उजगरे म्हणाले, पक्षाने दिलेली ही नवीन जबाबदारी माझ्यासाठी सन्मानासोबतच मोठी जबाबदारी आहे. आदरणीय शरदचंद्र पवार साहेब यांच्या पुरोगामी विचारांवर आणि प्रदेश व जिल्हा नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी अधिक ताकदीने काम करणार आहे. तळागाळातील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणार आहे.

आगामी काळात बीड जिल्ह्यात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासोबतच शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी, युवक, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावीपणे आवाज उठविण्याचा निर्धार ड. उजगरे यांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे वडवणीसह बीड जिल्ह्यातील पक्ष संघटनेला अधिक बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या नियुक्तीबद्दल ड. भास्करराव उजगरे यांचे पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्रपरिवार व हितचिंतकांकडून अभिनंदन होत असून, त्यांच्या पुढील संघटनात्मक वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

यावेळी वडवणी तालुकाध्यक्ष श्री. महादेवराव जमाले पाटील, जिल्हा संघटक बापूसाहेब घोलप, प्रा. प्रकाश जेधे, खलील भाई पठाण, शामसुंदर काळकुटे, अखिल भाई, अनिकेत उजगरे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## पान ६ वरुन...

### हिंदू सण-उत्सवांना विरोध

व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

निवेदनात काही समाजकंटकांकडून हिंदू सण-उत्सव साजरे करणाऱ्या महीलांना व नागरिकांना धमकीवजा इशारे दिले जात असल्याचे नमूद करण्यात आले आहे.अशा प्रकारांमुळे महिला,मुली,मुले तसेच सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता असल्याने पोलिस प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी करण्यात आली. गणेशोत्सव व नवरात्रोत्सवाच्या काळात धार्मिक कार्यक्रमांच्या ठिकाणी पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवावा, आयोजकांना आवश्यक संरक्षण द्यावे आणि कायदा व सुव्यवस्था बिघडविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच,धार्मिक कार्यक्रमांमध्ये महिलांशी गैरवर्तन, शिवीगाळ, मारहाण अथवा जाणीवपूर्वक वाद निर्माण करणाऱ्या व्यक्तींवर कोणताही मुलाहिजा न ठेवता कारवाई करावी,अशीही मागणी करण्यात आली आहे. माजलगाव शहरातील हिंदू नागरिकांनी पोलिस प्रशासनाला दिलेल्या या निवेदनाची दखल घेऊन आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर योग्य तो पोलीस बंदोबस्त व सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

### बीड-जाटनांदुर सायंकाळची

महत्त्वाचा आहे. त्यामुळे या मार्गावरील बससेवा बंद ठेवण्याचा निर्णय तातडीने मागे घेण्यात यावा.

बीड आगार प्रशासनाने विलंब न करता सायंकाळी ५.३० वाजताची बीड-जाटनांदुर बससेवा पूर्ववत सुरू करावी. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान अथवा प्रवाशांची गैरसोय यापुढे खपवून घेतली जाणार नाही. बससेवा तातडीने सुरू न झाल्यास संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे हा प्रश्न घेऊन जाऊन लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा स्पष्ट इशारा ॲड. प्रकाश कवठेकर यांनी दिला आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी आणि ग्रामीण जनतेच्या प्रवासाच्या हक्काशी तडजोड चालणार नाही; बससेवा सुरू होईपर्यंत पाठपुरावा सुरूच राहील, अशी ठाम भूमिका ड. कवठेकर यांनी व्यक्त केली.

### दुष्काळात शेतकऱ्यांची

रुपये घेतले जात असल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या अधिकाऱ्यांमार्फत बँकांच्या कारभारावर लक्ष ठेवावे, अशी मागणी करण्यात आली आहे. दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकरी आर्थिक अडचणीत असताना कर्जमाफी झाली पाहिजे, अशी मागणी करत शेतकरी बँकेच्या दारात बसून असल्याचे निवेदनात म्हटले आहे. कर्जाची फाईल दलालामार्फत आली तर काम केले जाते; मात्र शेतकरी स्वतः फाईल घेऊन गेल्यास त्याला अडचणींना सामोरे जावे लागते, असा आरोपही करण्यात आला आहे.

### माळापुरी-पेंडगाव-घोसापुरी

पडुळे, प्रेममामा गुरखुदे, मारुती तिपाले, सरपंच अशोक ढास, घोसापुरीचे सरपंच शेख फारुख, कल्याण बांड, सुंदर पवार, विश्वंभर गाडे यांच्यासह शेतकरी बांधवांनी जिल्हाधिकारी विवेक जॉनसन यांना लेखी निवेदन देऊन प्रस्तावित एमआयडीसीला विरोध नोंदविला.

'विकास हवा; पण शेतकऱ्यांच्या मुळावर नाही!'

जमिनीबाबत निर्णय घेताना संबंधित शेतकऱ्यांना विश्वासात घेणे आवश्यक आहे. शेतकरी विरोधात असताना केवळ प्रशासकीय प्रक्रियेच्या नावाखाली भूसंपादन पुढे रेटले तर त्याला रस्त्यावर उतरून विरोध केला जाईल, असा स्पष्ट इशारा अशोकराव हिंगे यांनी दिला.

शेतकऱ्यांची जमीन ही त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा आधार आहे. प्रशासनाने शेतकऱ्यांच्या भावना आणि मागणीचा गांभीर्याने विचार करावा. अन्यथा शेतकऱ्यांची जमीन वाचवण्यासाठी आम्ही रस्त्यावर उतरू, असा इशारा हिंगे यांनी दिला.

प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष

एमआयडीसीच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर शेतजमीन भूसंपादित करण्याच्या प्रस्तावामुळे परिसरातील शेतकरी अस्वस्थ झाले आहेत. प्रशासनाने त्यांची भूमिका गांभीर्याने घेऊन सर्वेक्षण व भूसंपादनाच्या प्रक्रियेबाबत स्पष्ट भूमिका जाहीर करावी.

लवकरच शेतकऱ्यांची बैठक घेऊन पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

चौकट : अमरसिंह पंडित यांची भेट

प्रस्तावित एमआयडीसीच्या प्रश्नाबाबत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस तथा माजी आमदार श्री. अमरसिंह पंडित यांची भेट घेऊन शेतकऱ्यांची भूमिका त्यांना सांगण्यात आली. येत्या दोन-तीन दिवसांत शेतकरी बांधवांशी संवाद साधून शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेऊ, असे आश्वासन त्यांनी दिले.

### मी जे बोलतो ते करूनच

फळबाग धारक शेतकऱ्यांना हेक्टरी किमान दीड ते दोन लाख रुपयांपर्यंत अनुदान मिळावी अशी मागणी मी यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस,शिवराजसिंह चौहान,तसेच केंद्रीय मंत्री अमितभाई शाह,यांची फळबाग धारक शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळासह भेट घेऊन फळबाग धारक शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणार असल्याचे आ.धस यांनी सांगितले.

**रोजगार हमीतून मजुरांना काम; फळबागांसाठी मोठ्या अनुदानाची मागणी**

या बैठकीत शेतकऱ्यांच्या वतीने दुष्काळाच्या काळात ग्रामीण भागातील मजुरांच्या हाताला काम मिळावे, रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर कामे उपलब्ध करून देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.तसेच फळबाग धारक शेतकऱ्यांसाठीही विशेष अनुदानाची मागणी जोर धरत असल्याचे दिसून आले.

**पशुधनासाठी थेट अनुदानाची मागणी..**

दुष्काळाच्या काळात पशुपालकांना दिलासा देण्यासाठी मोठ्या जनावरांसाठी प्रमाणात थेट अनुदान मिळावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होताना दिसली याबाबत आपलं घराणं मी नक्कीच शासनाकडे मांडणार असल्याचे आ. धस यांनी सांगितले.

## बीड येथील श्री तुळजाभवानी खासबाग देवी मंदिरात नवरात्र महोत्सवाची जय्यत तयारी

बीड । प्रतिनिधी

बीड शहराचे ग्रामदैवत असलेल्या श्री तुळजाभवानी श्री खासबाग देवी मंदिरातील शारदीय नवरात्र महोत्सवाच्या पूर्वतयारीसाठी विश्वस्त मंडळाची बैठक अध्यक्ष दिनकरराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. ११ ते २५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, महोत्सव यशस्वी करण्यासाठी आवश्यक नियोजनाबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. भाविकांनी विविध धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन विश्वस्त मंडळाने केले.

बैठकीस सचिव शरदराव घायाळ, पुजारी मच्छिंद्रबुवा बन महाराज, मंगलताई मोरे, अमोल चौरे, अभयसिंह कदम, झुंजार धांडे, संदीप आदमाने, गणेश गरुड, संदीप माने, अंबादास नवले, संतोष गिरी, कैलास शेजाळ, किशोर गिरी, अजित कदम, संदीप जोशी, बाळासाहेब जगदाळे, श्रीधर करमाळकर, शुभम गिरी व शैलेश गिरी यांच्यासह विश्वस्त उपस्थित होते.

१३ ऑक्टोबरला सकाळी ५.३० वाजता आरती, सायंकाळी ७ वाजता छबिना, रात्री ८ वाजता आरती आणि रात्री ९ वाजता आराधी जागर होणार आहे. १४ ऑक्टोबरला सकाळी ५.३० वाजता व रात्री ८ वाजता आरती होईल. १५ ऑक्टोबरला सकाळी ५.३० वाजता आरती, सायंकाळी ७ वाजता छबिना आणि रात्री ८ वाजता आरती होईल. १६ ऑक्टोबरला सकाळी ५.३० वाजता व रात्री ८ वाजता आरती होणार आहे. १७ ऑक्टोबरला सकाळी ५.३० वाजता आरती, सायंकाळी ७ वाजता छबिना आणि रात्री ८ वाजता आरती होईल. १८ ऑक्टोबरला सकाळी ५.३० वाजता व रात्री ८ वाजता आरती होणार आहे.

या कालावधीत मंदिरात होणाऱ्या सर्व धार्मिक कार्यक्रमांमध्ये भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन देवीमातेचे दर्शन व धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष दिनकरराव कदम, सचिव शरदराव घायाळ व विश्वस्त मंडळाने केले आहे.

## माजलगावात ओपन स्पेस लाटण्याचा सपाटा प्रशासन झोपेत आहे का? - डॉ.सचिन देशमुख

माजलगाव । प्रतिनिधी

शहरात नगर परिषदेच्या मोकळ्या जागा भूमाफियांकडून बिनदिक्कत गिळंकृत केल्या जात असताना प्रशासन मात्र जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याचा घणाघाती आरोप नगरसेवक डॉ. सचिन देशमुख यांनी केला आहे.

मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या खरमरीत निवेदनात त्यांनी प्रशासनाला थेट इशारा दिला आहे. सर्वे नंबर ३७४ मधील कोट्यवधींची ओपन स्पेस आणि रस्त्याची जागा अतिक्रमणधारकांनी बळकावली आहे. विशेष म्हणजे या जागेवर ब्राह्मण समाज सभागृहासाठी वारंवार मागणी करूनही प्रशासनाने ती जागा मोकळी ठेवली नाही, परिणामी अतिक्रमणधारकांचे फावले आहे. शहरातील इतर अनेक ओपन स्पेसवरही याच पद्धतीने अतिक्रमणाचा विळखा पडला आहे. हे तात्काळ हटवले नाही तर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल आणि त्याची सर्वस्वी




जबाबदारी मुख्याधिकारी आणि प्रशासनाची असेल. जर आठ दिवसात कारवाई झाली नाही, तर सर्व नागरिकांना रस्त्यावर उतरवून तीव्र जनआंदोलन छेडणार असल्याचा जहाल इशारा डॉ. सचिन देशमुख यांनी दिला आहे.

## अखेर वडगाव ढोक जिल्हा परिषदेची विठ्ठल मंदिरात भरणारी शाळा पुन्हा हक्काच्या इमारतीत भरली!

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील वडगाव ढोक येथील जिल्हा परिषद शाळेचा वहिवाटीचा रस्ता दोन शेतकऱ्यांनी तारेचे कुंपण उभारून बंद केल्याने गेल्या चार दिवसांपासून तब्बल १३० विद्यार्थ्यांना गावातील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात वर्ग भरवून शिक्षण घ्यावे लागत होते. अखेर तहसील प्रशासनाने दखल घेत तहसीलदारांच्या आदेशाने महसूल व पोलिस बंदोबस्तात तारेचे कुंपण हटवून शाळेचा रस्ता खुला केला. त्यामुळे विद्यार्थ्यांचे वर्ग पुन्हा त्यांच्या हक्काच्या शाळेच्या इमारतीत सुरू झाले असून पालकांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

संबंधित प्रकरणी सरपंच आशाबाई ढाकणे व सचिन ढाकणे यांनी तहसील




कार्यालयात शाळा भरविण्याचा इशारा दिला होता. सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान आणि शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांना लेखी निवेदन देऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी तातडीने शाळेचा रस्ता खुला करण्याची मागणी केली होती.

दि. ५ रोजी उपविभागीय अधिकारी शुभम पवार व तहसीलदार गितांजली गरड यांनी घटनास्थळी प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित शेतकऱ्यांना रस्ता खुला करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, त्यानंतरही रस्ता खुला न झाल्याने प्रशासनाने अखेर कठोर भूमिका घेतली.

दि. ७ रोजी दुपारनंतर तहसीलदार गितांजली गरड यांच्या आदेशानुसार पोलिस बंदोबस्तात तारेचे कुंपण हटवून शाळेचा रस्ता मोकळा करण्यात आला. यावेळी गेवराई पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे, पोलिस हवालदार राठोड, राऊत, बारगजे, महिला पोलिस अंमलदार शेळके व निगुळे तसेच महसूल प्रशासनाचे मंडळ अधिकारी जे. एस. लेंडाळ, ग्राममहसूल अधिकारी लक्ष्मण ईटनकर, ग्रामविकास अधिकारी नागरगोजे, सरपंच आशाबाई ढाकणे, सचिन ढाकणे व पालक उपस्थित होते.

**तिन दिवस मंदिरात वर्ग!**

शाळेचा रस्ता बंद झाल्यामुळे १३० विद्यार्थ्यांना तिन दिवस विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात वर्ग भरवून शिक्षण घ्यावे लागले. शाळेची इमारत असूनही रस्ता बंद असल्याने विद्यार्थ्यांना मंदिराचा आधार घ्यावा लागला.

**निवेदन अन् पाठपुराव्यानंतर अखेर कारवाई**

तहसील कार्यालयात शाळा भरविण्याचा इशारा, जिल्हा प्रशासनाला देण्यात आलेले लेखी निवेदन आणि प्रसारमाध्यमांनी प्रश्न लावून धरल्यानंतर अखेर प्रशासनाने पोलिस बंदोबस्तात रस्ता खुला केला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांकडे जिल्हा प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक असून भविष्यात शाळेच्या मूलभूत सुविधांवर अशा प्रकारे अडथळे निर्माण होणार नाहीत, याची दक्षता घेण्यात यावी, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली.

# महिला शेतकरी प्रमाणपत्र नोंदणीसाठी ३७ लाखांहून अधिक महिलांचे अर्ज प्राप्त

## कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांची माहिती

पुणे / प्रतिनिधी

महिला शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीतील योगदानाची अधिकृत ओळख मिळावी, यासाठी सुरू करण्यात आलेल्या महिला शेतकरी प्रमाणपत्र नोंदणीसाठी राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. ७ ऑक्टोबर पर्यंत राज्यभरातून तब्बल ३७ लाख ९३ हजार ०५१ अर्ज प्राप्त झाले आहेत. राज्यातील प्रत्येक पात्र महिला शेतकरी या उपक्रमाशी जोडली जावी, यासाठी कृषी विभागामार्फत सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत, असे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासनाने नुकतेच 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण कायदा, २०२६' विधेयक पारित केले आहे. त्यानुसार महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर ओळख, समान अधिकार आणि शासनाच्या कृषी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी शेतकरी महिला प्रमाणपत्र देण्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली आहे. ७ ऑक्टोबर पर्यंत राज्यभरातून तब्बल ३७ लाख ९३ हजार ०५१ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी राज्यातील ८९५ ग्रामपंचायतींनी ग्रामसभा घेऊन ६८ हजार ४३६ महिलांना शेतकरी महिला प्रमाणपत्र वितरित करण्यात आले आहे. ग्रामसभा झाल्यानंतर पुढील १५ दिवसांमध्ये शेतकरी महिलांना प्रमाणपत्र वितरित केले जाते. विदर्भ आणि मराठवाड्यासह राज्यातील विविध जिल्ह्यांतून मोठ्या प्रमाणात नोंदणी होत आहे. अर्जसंख्येत यवतमाळ जिल्हा आघाडीवर असून, तेथून २ लाख ५३ हजार ४३९ अर्ज



प्राप्त झाले आहेत. सातारा २ लाख १४ हजार ७८७, नाशिक २ लाख १० हजार ३२७, अमरावती २ लाख ०५ हजार ०७४, पुणे १ लाख ७३ हजार ०४९ एवढे अर्ज प्राप्त झाले आहेत. याशिवाय बुलढाणा, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, नंदुरबार, जळगाव, नांदेड, धाराशिव, धुळे, बीड आणि जालना जिल्ह्यांतून एक लाखांहून अधिक महिला शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. तालुकानिहाय नोंदणीत सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यात सर्वाधिक ३५ हजार ४२२ नोंदणी झाली आहे. कृषी विभागाच्या माध्यमातून जिल्हा व तालुकानिहाय नोंदणीचे सातत्याने संनियंत्रण केले जात असून, कमी नोंदणी असलेल्या भागांत जनजागृती करून नोंदणीला गती देण्यात येत आहे. अशी माहिती कृषी आयुक्त सुरज मांढरे यांनी दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ हा कालावधी 'सेवा संकल्प अभियान' म्हणून साजरा करण्यात येत असून, १७ सप्टेंबर रोजी महिला शेतकरी प्रमाणपत्राच्या ऑनलाइन पोर्टलचा शुभारंभ करण्यात आला. या सेवा संकल्प अभियानात आतापर्यंत राज्यातील विविध विभागांच्या तुलनेत कृषी विभागात सर्वाधिक नोंदणी झाली असून, महिला शेतकऱ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत सर्वाधिक सहभाग नोंदविला आहे. हा सहभाग महिला शेतकऱ्यांचा शासनाच्या योजनांबाबत वाढता विश्वास आणि सक्रिय सहभाग दर्शविणारा आहे, असे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले. तसेच राहिलेल्या महिलांनी लवकरात लवकर ऑनलाइन नाव नोंदणी करुन घ्यावी असेही त्यांनी आवाहन केले आहे.

# उसाला ५ हजारांवर दर मिळाला तरच ऊस शेती परवडू शकते- राजू शेट्टी

पुणे : साखरेचा किमान विक्री दर (एमएसपी) प्रति किलो ५० रुपये करावा. यामुळे पुढच्या वर्षी तुटणाऱ्या उसाला प्रति टन ५ हजारांवर आपोआप एफआरपी मिळेल. तसेच यावर्षी उसाला ५ हजारांपेक्षा जास्त दर मिळाला तरच ऊस उत्पादक शेतकऱ्याला ऊस शेती परवडू शकते, असे मत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी व्यक्त केले आहे. त्यांनी (दि. ३ ऑक्टोबर) फेसबुक लाईव्हद्वारे ऊस उत्पादक शेतकरी, साखर उद्योग आणि केंद्र सरकारचे धोरण यावर भाष्य केले.

देशभरात ऊस उत्पादन, ऊस क्षेत्र घटताना दिसत आहे. यावर्षी दुष्काळ पडला आहे. यामुळे उत्पादनात आणखी घट होऊ शकते, असा अंदाज त्यांश्नश्नी मांडला. ऊस आंदोलन केवळ महाराष्ट्र, कर्नाटकात होत आहे असे नाही. उत्तर प्रदेशच्या शेतकऱ्यांची प्रति क्विंटल ६०० रुपये म्हणजेच प्रति टन ६ हजार रुपये दराची मागणी आहे. आपल्या मागणीप्रमाणे उत्तर प्रदेशातील शेतकऱ्यांचीही अधिक ऊस दराची मागणी आहे. हीच मागणी गुजरात, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, तेलंगणातील शेतकऱ्यांची आहे. देशभरातील सगळ्या शेतकऱ्यांचा नेत्यांची हाच सूर आहे. यावर्षी उत्पादन खर्च वाढला आहे. रासायनिक खते, मजुरी महागली आहे. यामुळे उसाला वाढीव दर मिळायला हवा, अशी मागणी त्यांनी केली. तज्ज्ञांच्या अंदाजानुसार, यंदापेक्षा वाईट अवस्था पुढच्या वर्षी असणार आहे. पुढील दोन वर्षे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वाईट जाणार आहेत. अशा परिस्थितीत देशात साखरेची टंचाई निर्माण होईल. ही टंचाई कमी करायची असेल. आपल्या गरजेएवढी साखर बाजारात उपलब्ध करायची असेल तर जवळपास ३० ते ३५



लाख टन आयात करण्यासंदर्भात निर्णय घ्यावा लागेल. यामुळे साखरेचे भाव कडाडणार आहेत. साखर आयात करायची वेळ आली तर ग्राहकांना ६५ ते ७० रुपये दराने साखर विकत घ्यावी लागेल, असे त्यांनी नमूद केले. साखर टंचाईच्या पार्श्वभूमीवर १ ऑक्टोबरपासून ऊस गाळप करण्याचा प्रयत्न होता. पण तो आम्ही हाणून पाडला, असे त्यांनी सांगितले. हुबळी येथील शेतकरी आंदोलनादरम्यान आश्वासन दिल्याप्रमाणे १२ ऑक्टोबर रोजी केंद्रीय अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या पुढाकाराने एक बैठक दिल्लीत होत आहे. या बैठकीसाठी शेतकरी नेते तसेच कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना बोलावण्यात आले आहे. पण महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांना बोलावल्याचे दिसून येत नाही, असे शेट्टी यांनी निदर्शनास आणून दिले. स्वाभिमानी शेतकरी संघटनेची २५ वी ऊस परिषद १० ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजता जयसिंगपूर येथे होणार आहे. तिथे आपण ऊस दरावर विचार करु. या परिषदेसाठी शेतकऱ्यांनी यावे, असे आवाहन त्यांनी केले.

# 'शक्तिपीठ' मोजणीविरोधात राज्यभर आंदोलन करणार

## १३ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचा इशारा

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यातील नांदोरे परिसरातील आव्हे, बाव्हे व सोळंकरवाडी येथे शेतकऱ्यांच्या विरोधानंतरही पोलिस बंदोबस्तात करण्यात आलेल्या शक्तिपीठ महामार्गाच्या जमीन मोजणीच्या निषेधार्थ राज्यभर आंदोलन करण्याचा निर्णय शक्तिपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीच्या झालेल्या ऑनलाइन बैठकीत घेण्यात आला.

९ ऑक्टोबरला प्रत्येक जिल्ह्यात निवेदने देऊन निदर्शने करण्यात येणार असून, ११ ऑक्टोबरला कोल्हापुरात राज्यातील प्रमुख प्रतिनिधींची बैठक घेऊन पुढील आंदोलनाची रणनीती ठरविण्यात येणार आहे. या बैठकीमध्ये कोल्हापूर, सांगली, सोलापूर, सिंधुदुर्ग, धाराशिव, लातूर, नांदेड, हिंगोली, परभणी, यवतमाळ, वर्धा व सातारा यांसह १३ जिल्ह्यांतील शेतकरी सहभागी झाले. या वेळी आमदार जयंत पाटील, आमदार सतेज पाटील, माजी खासदार राजू शेट्टी व समितीचे समन्वयक गिरीश फोंडे यांनी मार्गदर्शन केले.

जयंत पाटील यांनी शेतकऱ्यांचा विरोध स्पष्ट असतानाही दडपशाहीने मोजणी केली जात असल्याचा आरोप करत आंदोलनाची व्यूहरचना करण्याचे आवाहन केले. सतेज पाटील यांनी शक्तिपीठ महामार्गासाठी प्रस्तावित निधी दुष्काळग्रस्त शेतकरी व जनतेसाठी वापरण्याची मागणी केली. शेट्टी यांनी विविध आंदोलनांना एकत्रित करून राज्यव्यापी लढा उभारण्याचे आवाहन केले.

दरम्यान, २२ ऑक्टोबरपर्यंत सोलापूर जिल्ह्यात सुरू असलेल्या मोजणीच्या ठिकाणी राज्यभरातील शेतकऱ्यांनी उपस्थित राहावे, तसेच सर्वपक्षीय व्यापक लढा उभारावा, असे निर्णय घेण्यात आले. बैठकीस विविध शेतकरी संघटनांचे पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# शेतकऱ्यांनो. रब्बी पिके पेरण्यापुर्वी अशी काळजी घ्या

खरीप हंगामात सलग तीन ते चार आठवडे पावसाचा खंड पडल्याने अनेक भागांतील जमिनीतील नैसर्गिक ओलावा कमी झाला आहे. त्यामुळे यंदाच्या रब्बी हंगामात पिकांची निवड आणि पेरणीचे नियोजन शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे ठरणार आहे. उपलब्ध पाण्याच्या आधारावर सरसकट पेरणी करण्याऐवजी जमिनीचा प्रकार, त्यातील ओलावा आणि सिंचनाची उपलब्धता यांचा विचार करूनच पीक नियोजन करावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. विशेषतः हलक्या व उथळ जमिनीत ओलावा कमी असल्यास पेरणी करून पीक अडचणीत आणण्यापेक्षा जमीन पडीक ठेवून खरीप पिकांच्या अवशेषांचे आच्छादन करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. दुसरीकडे, भारी आणि खोल काळ्या जमिनीत ओलावा अधिक काळ टिकत असल्याने अशा जमिनीत कमी पाण्यात येणाऱ्या रब्बी पिकांना प्राधान्य देता येणार आहे.

भारी जमिनीत करडई, हरभरा, जवसाला प्राधान्य :भारी व खोल काळ्या जमिनीत पाण्याची धरून ठेवण्याची क्षमता अधिक असते. त्यामुळे उपलब्ध ओलाव्याचा फायदा घेण्यासाठी करडई, देशी कोरडवाहू हरभरा आणि जवस या पिकांची निवड करता येईल. कृषी विभागाच्या शिफारशीनुसार करडईसाठी हेक्टरी १० ते १२ किलो, हरभऱ्यासाठी ६५ ते ७० किलो, तर जवसासाठी २५




ते ३० किलो बियाणे वापरण्याचे नियोजन करावे.

मध्यम जमिनीत कमी कालावधीच्या पिकांची निवड :मध्यम काळ्या जमिनीत उपलब्ध ओलावा लक्षात घेऊन कमी कालावधीत तयार होणाऱ्या आणि पाण्याचा ताण सहन करणाऱ्या पिकांना प्राधान्य देणे फायदेशीर ठरू शकते. यामध्ये रब्बी ज्वारी आणि मोहरी यांचा विचार करता येईल. ज्या शेतकऱ्यांकडे सिंचनाची सुविधा उपलब्ध आहे, तेथे परिस्थितीनुसार चिया पिकाची लागवड करण्याचाही पर्याय कृषी विभागाने सुचवला आहे.

हलक्या जमिनीत पेरणी टाळण्याचा सल्ला :हलक्या व उथळ जमिनीत सध्या पुरेसा ओलावा नसल्यास रब्बीची पेरणी करणे जोखमीचे ठरू शकते. विशेषतः सिंचनाची सुविधा नसलेल्या शेतात पेरणी करून नंतर पाण्याअभावी पीक ताणात येण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत रब्बीची पेरणी न करता जमीन पडीक ठेवावी आणि खरीप पिकांच्या अवशेषांचे आच्छादन करावे, असा सल्ला कृषी विभागाने दिला आहे. यामुळे जमिनीतील उरलेला ओलावा टिकवून ठेवण्यास मदत होऊ शकते.

सोयाबीननंतर नांगरट न करता थेट पेरणी :रब्बी पिकांची उत्पादकता टिकवण्यासाठी उपलब्ध ओलाव्याचा जास्तीत जास्त कार्यक्षम वापर करणे आवश्यक आहे. त्यासाठी झिरो टिलेज तंत्राचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सोयाबीनची काढणी झाल्यानंतर नांगरट न करता उपलब्ध ओलाव्यावर 'झिरो टिल सीड कम फर्टीलायझर ड्रिल'च्या साहाय्याने थेट पेरणी करता येईल. पेरणी शक्यतो १५ ऑक्टोबरपूर्वी आणि जमिनीतील ओलाव्याच्या थरात ५ ते ६ सेंटीमीटर खोलीवर पूर्ण करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. पेरणीपूर्वी बियाण्याची योग्य बीजप्रक्रिया करणेही महत्त्वाचे आहे.

उगवणीनंतर झाडांची संख्या नियंत्रित करा : उगवणीनंतर साधारण १५ ते २० दिवसांनी विरळणी करावी. उपलब्ध जमिनीतील ओलावा लक्षात घेऊन झाडांची संख्या साधारण २० टक्क्यांनी कमी ठेवण्याचा सल्ला देण्यात आला आहे. यामुळे उपलब्ध ओलाव्यावर पिकांमधील स्पर्धा कमी होऊन प्रत्येक झाडाला उपलब्ध पाणी आणि अन्नद्रव्यांचा तुलनेने चांगला उपयोग करता येऊ शकतो.

ओळींमध्ये भुशाचे आच्छादन :जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी पिकांच्या ओळींमध्ये भुशाचे आच्छादन करण्याचा उपायही कृषी विभागाने सुचवला आहे. उपलब्ध ओलावा जास्त काळ टिकवणे हे यंदाच्या रब्बी हंगामातील पीक व्यवस्थापनाचे प्रमुख उद्दिष्ट ठरणार आहे. पिकाला पाण्याचा ताण जाणवत असल्यास परिस्थितीनुसार पोटॅशियम नायट्रेट किंवा दोन टक्के युरियाची फवारणी करण्याचा पर्याय देण्यात आला आहे.

हरभऱ्यात शेंडे खुडण्याचा सल्ला :हरभरा पीक साधारण २० ते २५ दिवसांचे झाल्यानंतर शेंडे खुडण्याचे तंत्र अवलंबण्याचाही सल्ला देण्यात आला आहे. उपलब्ध संसाधनांचा कार्यक्षम वापर करून पिकाची वाढ आणि उत्पादन टिकवण्याच्या दृष्टीने हे तंत्र वापरता येते.

पाणी कमी असेल तर गहू, मका टाळा :यंदाच्या परिस्थितीत सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पाण्याचे नियोजन. मर्यादित पाणीसाठा उपलब्ध असताना अधिक पाण्याच्या पाळ्या लागणाऱ्या गहू आणि मका या पिकांची निवड टाळावी, असे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. ज्या शेतकऱ्यांकडे सिंचनाची सुविधा आहे त्यांनीही पाण्याचा अपव्यय होणार नाही याची काळजी घ्यावी. मोकाट किंवा फ्लड सिंचनाऐवजी तुषार किंवा ठिबक सिंचनाचा वापर केल्यास उपलब्ध पाण्याचा अधिक कार्यक्षम वापर करता येईल. जमिनीचा प्रकार पाहूनच रब्बीचे नियोजन : यंदाच्या रब्बी हंगामात प्रत्येक शेतात एकच पीक घेण्याचा आग्रह धरण्यापेक्षा जमिनीतील ओलावा आणि सिंचनाची उपलब्धता यानुसार पीक निवडणे अधिक महत्त्वाचे ठरणार आहे. भारी जमिनीत ओलावा टिकत असल्याने करडई, हरभरा, जवस यांसारख्या पिकांना प्राधान्य देता येईल; मध्यम जमिनीत कमी कालावधीची पिके निवडता येतील. मात्र हलक्या जमिनीत पुरेसा ओलावा आणि सिंचनाची खात्री नसेल तर पेरणी टाळणेच अधिक सुरक्षित ठरू शकते.




### महत्वाच्या घटना

१४१० : प्राग खगोलशास्त्रीय घडामोडींचा प्रथम उल्लेख करण्यात आला.
१४४६ : हंगुल वर्णमाला कोरिया मध्ये प्रकाशित झाली.
८०६ : प्रशियाने फ्रान्सविरुद्ध युद्ध पुकारले.
१८७४ : संयुक्त राष्ट्राच्या सदस्य देशांसोबत जगभरातील टपाल प्रणाली व्यतिरिक्त टपाल धोरणांचे समन्वय साधण्यासाठी संयुक्त राष्ट्राची एजन्सी असलेल्या युनिव्हर्सल पोस्टल युनियन ची स्थापना करण्यात आली.
१९४९ : सी राजगोपालचारी यांनी टेरीटोरियल आर्मी ची स्थापना केली.
१९६० : विद्याधर गोखले यांच्या 'पंडितराज जगन्नाथ' या नाटकाचा पहिला प्रयोग झाला.
१९६२ : युगांडाला (युनायटेड किंग्डमकडून) स्वातंत्र्य मिळाले.
१९८१ : फ्रान्समधे मृत्यूदंडाची शिक्षा रद्द करण्यात आली.
१९९३ : पशुवैद्यक डॉ. काजल तांबे यांचा जन्म.
२०१२ : पाकिस्तान देशातील शालेय विद्यार्थिनी व मानवाधिकार कार्यकर्ता मलाला युसुफ यांना तालिबान संघटनेच्या आतंकवाद्याने गोळी मारली होती.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६२४ : मुघल बादशहा शाहजहां आणि महारानी मुमताज महल यांचा धाकटा मुलगा मुहम्मद मुराद बख्श यांचा जन्मदिन.
१७५७ : चार्ल्स (दहावा) – फ्रान्सचा राजा (मृत्यू: ६ नोव्हेंबर १८३६)
१८२६ : प्रसिद्ध भारतीय हिंदी साहित्यकार राजा लक्ष्मण सिंह यांचा जन्मदिन.
१८५० : फ्रेन्च रसायनशास्त्रज्ञ हेन्री लुईस ली चॅटॅलिअर यांचा जन्म. (मृत्यू: १७ सप्टेंबर १९३६)
१८५२ : एमिल फिशर – रासायनिक प्रक्रियेद्वारे शर्करा रेणूंच्या निर्मितीसाठी १९०२ मध्ये नोबेल पुरस्कार मिळालेले जर्मन रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: १५ जुलै १९१९)
१८७६ : पंडित धर्मानंद कोसंबी – बौद्ध धर्माचे अभ्यासक (मृत्यू: ४ जून १९४७)
१८७७ : पण्डित गोपबंधूदास तथा 'उत्कलमणी' – ओरिसातील समाजसुधारक, सामाजिक कार्यकर्ते, स्वातंत्र्यसेनानी, कवी व लेखक (मृत्यू: १७ जून १९२८)
१८८९ : डेल्टा एअर लाईन्स चे सहसंस्थापक कॉलेट ई. वूल्मन यांचा जन्म. (मृत्यू: ११ सप्टेंबर १९६६)
१८९१ : उद्योजक, साहित्यिक व चित्रकार शंकरराव वासुदेव किर्लोस्कर यांचा जन्म. (मृत्यू: १ जानेवारी १९७५)
१८९७ : साली भारतीय कायदेपंडित, राजकारणी व तामिळनाडू राज्यातील प्रख्यात भारतीय स्वतंत्रता सेनानी व माजी मुख्यमंत्री मिंजूर भक्तवत्सलम यांचा जन्मदिन.
१९२२ : संशोधक, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे जैवभौतिक शास्त्रज्ञ गोपालसमुद्रम नारायण अय्यर रामचंद्रन तथा डॉ. जी. एन. रामचंद्रन यांचा जन्म. (मृत्यू: ७ एप्रिल २००१ – चेन्नई, तामिळनाडू)
१९२४ : भारतीय कवि आणि स्कॉलर थिरूनलूर करुणाकरन यांचा जन्म. (मृत्यू: ५ जुलै २००६)
१९२६ : जबरदस्त आवाजाने संवादफेक करून प्रेक्षकांना खूष करणारा हिन्दी चित्रपट अभिनेता कुलभूषण पंडित तथा राजकुमार ऊर्फ जानी यांचा जन्म. (मृत्यू: ३ जुलै १९९६)
१९२८ : ऑस्ट्रेलियाचा क्रिकेटपटू नील हार्वे यांचा जन्म.
१९३० : भारतीय इंग्रजी दिग्दर्शक आणि निर्माता अलेसदैर मिल्ने यांचा जन्म. (मृत्यू: ८ जानेवारी २०१३)
१९३५ : द फ्लाइंग सिख मिल्खा सिंग यांचा जन्म.
१९४५ : पद्मविभूषण पुरस्कार तसचं, संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय शास्त्रीय सरोद वादक उस्ताद अमजद अली खान यांचा जन्मदिन.
१९६६ : डेव्हिड कॅमरुन – इंग्लंडचे पंतप्रधान

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८९२ : रावबहादूर गोपाळ हरी देशमुख ऊर्फ 'लोकहितवादी' – पत्रकार, समाजसुधारक व इतिहासकार. १८४८ ते १८५० या काळात 'प्रभाकर' या साप्ताहिकातून त्यांनी शतपत्रांचे लेखन केले. स्त्रियांचा कोंडमारा करणार्या रुढींवर त्यांनी प्रहार केला. त्यांनी ४३ मराठी ग्रंथ लिहिले. 'लक्ष्मीज्ञान' हा त्यांचा ग्रंथ हा अर्थशास्त्रावरील पहिला मराठी ग्रंथ आहे. (जन्म: १८ फेब्रुवारी १८२३)
१९१४ : विनायक कोंडदेव ओक – बालवाङ्मयकार. मुलांसाठी 'बालबोध' हे मासिक काढून त्यांनी चरित्रे, कविता, निबंध, शास्त्रीय विषयांवरील लेख इ. लेखन केले व मराठी बालवाङ्मयाचा पाया घातला. त्यांची सुमारे पन्नास पुस्तके प्रसिद्ध झाली. सहज व सोपी भाषा हे त्यांचे वैशिष्ट्य होते. (जन्म: २५ फेब्रुवारी १८४०)
१९५५ : गोविंदराव टेंबे – हार्मोनियम वादक, अभिनेते व संगीतकार, नाट्यसंगीताचे पहिले शिल्पकार, पहिल्या बोलपटाचे संगीत दिग्दर्शक, संगीत क्षेत्रातील पहिले सौंदर्य मीमांसक, संगीतिकांचे प्रवर्तक. 'अयोध्येचा राजा', 'अग्निकंकण', 'मायामच्छिंद्र' हे त्यांचे गाजलेले चित्रपट आहेत. हार्मोनियम या साथीच्या वाद्याला त्यांनी स्वतंत्र वाद्याची प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. (जन्म: ५ जून १८८१)
१९६३ : भारतीय स्वातंत्र्य सेनानी, बॅरिस्टर, राजकारणी आणि पाकिस्तान चळवळीचे समालोचक तसचं, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सदस्य व पंजाब प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रमुख सैफुद्दीन किचलू यांचे निधन.
१९८७ : गुरू गोपीनाथ – कथकली नर्तक (जन्म: २४ जून १९०८)
१९९८ : जयवंत पाठारे – 'आह', 'अनाडी', 'अनुराधा', 'छाया', 'सत्यकाम', 'आनंद', 'अभिमान', 'गोलमाल' यांसारख्या गाजलेल्या चित्रपटांचे छायालेखक (जन्म: )

# गावगाड्यात पुन्हा घुमला विमानतळ नको, पाणी द्याचा आवाज

## शेकटा येथे पाण्यासाठी ग्रामस्थ एकवटले : लोकलढ्याच्या बैठकांत शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग





बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील वंचित भागातील शेतीला जायकवाडी धरणाचे हक्काचे पाणी द्यावे, यासाठी लोकलढा आंदोलनच्या वतीने गावोगाव पाणी जागर बैठका घेतल्या जात आहेत. या बैठकांमध्ये विमानतळ नको, पाणी द्या... या घोषणांनी गावगाडा दणाणला जात आहे. आपल्या शेतीला जायकवाडी धरणाचे हक्काचे पाणी मिळालेच पाहिजे यासाठी शेतकरी उत्स्फूर्तपणे बैठकांमध्ये सहभागी होत आहेत.बुधवार दि. ७ ऑक्टोबर रोजी गेवराई तालुक्यातील शेकटा येथे लोकलढा आंदोलनाची बैठक संपन्न झाली. यावेळी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बीड जिल्ह्यातील शिरूर, बीड, गेवराई, वडवणी व माजलगाव तालुक्यातील वंचित भागातील शेतीला जायकवाडी धरणाचे हक्काचे पाणी द्यावे, गोदावरी -सिंदफणा नदीजोड प्रकल्प व उपकालवा करावा, कोकणात वाहून जाणारे १६८ टीएमसी पाणी जे गोदावरी खोऱ्यात येणार आहे, त्यात बीड जिल्ह्यातील शेतीला हक्काचे पाणी मिळावे यासाठी गेल्या तीन वर्षांपासून लोकलढा आंदोलन सुरू आहे. १४० पेक्षा अधिक गावातील शेतकर्यांनी एकत्र येऊन सुरू केलेल्या या आंदोलनची येत्या २७ ऑक्टोबर रोजी नाथापूर येथे सकाळी ११ वाजता महाबैठक आयोजित केली आहे. या बैठकीसाठी वंचित भागातील सर्व शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे यासाठी लोकलढा आंदोलनच्या वतीने गावोगाव जाग बैठकांचा धडाका सुरू आहे. गेल्या तीन दिवसांत कुक्कडगाव, खुंड्रस, वाहेगाव, पाचेगाव, बंगालीपिंपळा, शेकटा, दगडगाव, चव्हाणवाडी, इरगाव, कोपरा आदी गावांमध्ये जोरदार बैठका झाल्या. कोणत्याही शेतकऱ्यांनी विमानतळाची मागणी न करता शासन विमानतळाचा घाट घालत आहे, विमानतळ करण्याऐवजी अगोदर गोदावरी -अमृता-सिंदफणा नदीजोड प्रकल्प व उपकालवा करावा अशी शेतकऱ्यांची आग्रही मागणी आहे. ही योजना केल्यास श्री क्षेत्र भगवान गड ते तालखेड (माजलगाव) व गोदावरी ते सिद्रफणा दरम्यानच्या सर्व शेतीला पाणी मिळेल, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. त्यामुळे विमानतळ नको, पाणी द्या... शेतकऱ्यांचा लोकलढा, जायकवाडीचे पाणी सोडा... अशा घोषणांनी गावगाडा दणाणला जात आहे. यंदा समाधानकारक पाऊस नसल्याने शिरूर ते माजलगाव पर्यंतच्या फळबागा, ऊस, कापूस, सोयाबीन, तूर अशी सर्वच शेतीपिके वाया गेली असून शेतकरी प्रचंड तोट्यात आहेत. अशी परिस्थिती दर दोन-तीन वर्षांनी येते. यामुळे या भागातील शेतीला जायकवाडी धरणाचे हक्काचे पाणी मिळावे अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. हा लोकलढा आणखी बुलंद करण्यासाठी व शासनाने नदीजोड प्रकल्प गतीने करावा यासाठी नाथापूर येथे आयोजित केलेल्या महाबैठकीस गावोगावच्या शेतकऱ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहनही या जागर बैठकांमधून समन्वयक करीत आहेत.

### शेकटा येथे बैलगाडीतून जनजागृती

लोकलढा आंदोलनाच्या जागर बैठकीस गावोगाव वाजतगाजत जाऊन शेतकरी सहभागी होत आहेत. गेवराई तालुक्यातील शेकटा येथे बैलगाडीतून मिरवणूक काढून शेतकरी जागृती करण्यात आली. या गावफेरीत लहानथोरांसह ज्येष्ठ शेतकरी, महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### शेकटा ग्रामस्थांचा पिण्याच्या पाण्यासाठी टाहो

गेवराई तालुक्यातील शेकटा येथे गेल्या दहा वर्षापासून विकतचे पाणी घ्यावे लागत असल्याचे भयानक चित्र दिसून येत असून बुधवारी रात्री लोक लढा आंदोलनाच्या वतीने पाण्यासाठी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये शेकटा येथील महिला वर्गांनी पिण्याचे पाणीही मिळत नसल्याचा टाहो फोडला.

# बँड पथकाच्या साक्षीने नवरात्रोत्सवाच्या मोहटा देवी देवस्थानच्या पत्रिकांचे वाजत गाजत वाटप



पाथर्डी । प्रतिनिधी

शारदीय नवरात्र उत्सवामध्ये तालुक्यातील विविध बँड पथके पंधरा दिवस मोहटादेवी गडावर बँड वादनाची सेवा देवीच्या चरणी अर्पण करत कला सादर करतात या सेवेचा प्रारंभ नवरात्रोत्सवाच्या कार्यक्रम पत्रिका पंचक्रोशीतील गावांमध्ये दारोदारी बँड वाजवत वितरित केल्या जातात तालासुरामध्ये कार्यक्रम पत्रिका चे वाटप सुद्धा वेगळे सात्विक वातावरण निर्माण करते राज्यात अशी प्रथा राज्यात फक्त मोहटादेवी देवस्थान कडून पाळली जाते यामुळे भाविक व देवस्थान समिती या दोघांमध्ये वेगळीच भावनिक नाते निर्माण होते.

पाथर्डी शहरामध्ये सुद्धा अशा प्रकारच्या सादरीकरणामुळे नवरात्र दारावर येऊन ठेपल्याची जाणीव सर्वांना झाली शुभ कार्य व आनंदाच्या प्रसंगी दारासमोर बँड वाजवून इतरांनाही आनंदात सहभागी करून घेतले जाते बँड वाजवून एखादा कार्यक्रम केला म्हणजे त्यामध्ये समाज मान्यतेसह सामाजिक प्रतिष्ठा साधली जाऊन कार्यक्रमावर समाज मान्यतेचा शिक्का मोर्तब होतो देवस्थान समितीने विविध गावांसाठी कर्मचाऱ्यांची पथके तयार केली आहेत येत्या दोन दिवसांमध्ये महाराष्ट्रातील संभाजीनगर अहिल्यानगर नाशिक जालना बीड पुणे अशा विविध ठिकाणी पत्रिका वाटप व सार्वजनिक मंदिरांच्या भिंतीवर पोस्टर चिकटवण्याचे काम पूर्ण होईल कार्यक्रमाची पत्रिका बँड लावून वाटण्याची देवस्थान समितीची प्रथा भाविकांच्या भावनेला हात घालणारी ठरते या एकाच निमंत्रणामुळे पंचक्रोशीतील भाविक देवस्थान समितीला सर्वतोपरी सहकार्यासाठी भरीव मदतीचा हात पुढे करतात नवरात्र घटस्थापनेच्या वेळी देवी मुखवट्याची गावातून वाजत गाजत मिरवणूक काढली जाते त्या दिवसापासून कोजागिरी पौर्णिमेच्या उत्सवापर्यंत दररोज बँड वादनाची सेवा देवीच्या दरबारात सादर केली जाते यात्रेच्या पंधरा दिवसाच्या कालावधीमध्ये बँड पथकातील वेगवेगळे कलाकार विविध पथकाच्या माध्यमातून एकत्र येत कला सादर करतात अगदी नवखे कारागीर सुद्धा अनेक दिवसांपासून या उत्सवासाठी सराव करतात बँड वादनामुळे नवरात्रोत्सव काळात देवी गडावर दिवसभर वातावरण अतिशय सकारात्मक व पवित्र राहते.

कोजागिरी पौर्णिमे नंतर देवस्थान समितीच्या वतीने विविध बँड पथकांना प्रसाद स्वरूपात मानधन म्हणजे बिदागी दिली जाते हीच बिदागी म्हणजे देवीचा आशीर्वाद समजून दिवाळीनंतर सुरू होणाऱ्या लग्नसराईच्या हंगामासाठी सर्व कलाकार देवीचा आशीर्वाद घेऊन उद्योग व्यवसायाला मार्गस्थ होतात.

**मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे**

# ऐन दुष्काळात खरवंडी कासार परिसरात महावितरणाचे लोडशेडिंग विज बंद झटके !

पाथर्डी । प्रतिनिधी

ऐन कोरडा दुष्काळ जन्य परिस्थितीत रात्री व मध्यरात्री खरवंडी कासार आणि आसपास असणाऱ्या बारा वाड्यात महावितरणाने लोडशेडींगचे विजेचे झटके देण्यास सुरुवात केली आहे चार दिवस उलटून गेले तरी खरवंडी कासार परिसरासह मालेवाडी खरवंडी कासार किर्तनवाडी ढाकणवाडी गावात विज येऊ शकली नाही ऐन दुष्काळाच्या छायेत व कडाक्याच्या ३८ ते ४० अंश रखरखत्या तापमानात उष्माघाताने पाथर्डी तालुक्यात लहान बालके वयोवृद्ध माणसं यांचा जीव जाण्याची शक्यता असताना गेल्या चार-पाच दिवसापासून मालेवाडी गावात विद्युत वाहिन्या व तारांच्या लाईन शिफ्टिंगचे काम सुरू असल्यामुळे गेल्या काही दिवसपासून दिवसा वीज अचानक जाते तर कधी रात्री व मध्यरात्री जाते यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

या सर्व परिस्थितीत रात्री अपरात्री चोरी डकैती लूटमार अशा घटना ग्रामीण भागात नेहमी घडत असतात व पुढे घडण्याची शक्यता नाकारता येत नाही यामुळे ग्रामीण भागातील जनता त्रस्त झाली आहे यामुळे नेहमीच विजेचा अपुरा पुरवठा वरिष्ठ पातळीवरून तांत्रिक व आता तर थेट लोडशेडींगचे कारण देत दररोज दोन ते चार तास वीज दिवसेंदिवस राहत नसल्याने आणि रात्रभर विज नसल्याने वीज ग्राहकांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे यामुळे विजेचा पुरवठा सुरळीत करण्यासह रात्री व मध्यरात्री लोडशेडिंगचे कारण न देता नियमित विद्युत पुरवठा करण्यात यावा अशी मागणी वीज ग्राहकांनी केली आहे.

खरवंडी कासार आणि आसपास असणाऱ्या गाव खेड्यात वीज पुरवठा नेहमीच खंडित होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहे तूर्तास तरी मुंबईवरून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळ कडून लोडशेडिंगचे आदेश असल्याने काही काळ विद्युत पुरवठा बंद करावा लागतो त्यातही वरिष्ठ कार्यालय व अधिकाऱ्यांशी चर्चा करून ग्रामीण भागातील अडचणी सांगून रात्री व मध्यरात्री वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल - अरविंद कुकडे ( उपअभियंता पाथर्डी विद्युत महावितरण)

# भावार्थ दौंड यांची उपाध्यक्षपदी निवड

पाथर्डी । प्रतिनिधी



पाथर्डी शेवगाव मतदार संघातील सोनोशी गावचे भूमिपुत्र व कल्याण येथे कार्यरत असलेले युवा नेते भावार्थ दौंड यांची नुकतीच भाजप युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली देवेंद्र फडणवीस प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी भाजप युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी जाहीर केली त्यात मूळ सोनोशी गावचे भावार्थ दौंड यांची महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निवड झाली भावार्थ दौंड हे गेल्या अनेक वर्षापासून भाजपा पक्षाचे सक्रिय सदस्य राहिले असून चळवळीत व संघटनेत महत्त्वाची भूमिका त्यांनी निभवलेली आहे.

# बुद्धिस्टडी आणि विपासना या विषयावर एक दिवशी कार्यशाळा

बीड। प्रतिनिधी

प्रगती सेवाभावी संस्था व शासकीय निवासी शाळा शिरूर कासार यांच्या संयुक्त विद्यमाने व सन्माननीय श्री. प्रदीप भोगले साहेब (सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण बीड)यांच्या मार्गदर्शनपर सूचनेनुसार एक दिवसीय बुद्धिस्टडी आणि विपासना /ध्यान धारणा शिबिरचे आयोजन करण्यात आले. शिबिरासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून आदरणीय भंते बुद्ध बोधी(धम्मभूमी महाविहार शिवणी,बीड) यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान शाळेचे मुख्याध्यापक श्री.एस.आर सानप यांनी भूषवले तर प्रमुख अतिथी म्हणून प्रगती सेवाभावी संस्थेचे सचिव श्री गणेश आवंतकर तसेच दैनिक सकाळचे उपसंपादक श्री.चंद्रकांत राजहंस सर व शाळेचे गृहपाल श्री एस.एम.पाचे सर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीस जगाला शांततेचा संदेश देणारे,महाकारुणिक तथागत गौतम बुद्ध यांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले.त्यानंतर उपस्थित मान्यवर यांचा स्वागत सत्कार संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक आदरणीय भंते बुद्ध बोधी यांनी विद्यार्थ्यांना बुद्धिस्टडी आणि विपासना /ध्यान धारणे विषयी सखोल मार्गदर्शन केले तसेच अभ्यासामध्ये एकाग्रता वाढविण्यासाठीची आवश्यकता स्पष्ट केली.तसेच प्रत्यक्ष ध्यान धारणा, आनापान साठी च्या आवश्यकता सूचना देऊन प्रत्यक्ष ध्यानधारणा करण्यात आली. याप्रसंगी बोलताना शाळेचे मुख्याध्यापक श्री सानप सर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सदरील उपक्रमाचे महत्त्व विशद केले.प्रगती सेवा भावी संस्था पाडळीचे सचिव श्री.अनिल आवंतकर यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले.तसेच श्री राजहंस सर यांनी शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी शाळेतील शिक्षक श्री चाटे सर,श्री शिरसाट सर,श्री वाघमारे सर,श्री शिंदे सर तसेच श्रीमती निकाळजे मॅडम व प्रगती सेवाभावी संस्थेचे इतर सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री एस.के.फंड(विपश्यना साधक) सर यांनी तर आभार प्रदर्शन श्री.अशोक वाघमारे सर यांनी केले. अशाप्रकारे शासकीय निवासी शाळा शिरूर कासार जिल्हा बीड या ठिकाणी सेवा संकल्प अभियानांतर्गत ध्यानधारणा शिबिर आयोजित करण्यात आले.



# दुष्काळी परिस्थितीत मजुरांना गावातच तात्काळ कामे उपलब्ध करून द्यावीत-जिल्हाधिकारी

जालना

दुष्काळ दूषित परिस्थितीमध्ये जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचे निर्णय जनतेसाठी चांगले आहे परंतु त्याचा वापर अधिकारी कर्मचारी करीत नाही यावरून अनेक प्रकरण समोर आलेले आहे. संबंधित कामसुकार अधिकारी कर्मचाऱ्यावर कारवाई केल्यास खरा न्याय दुष्काळ परिस्थितीमध्ये नागरिकांना मिळेल. जिल्ह्यामध्ये दुष्काळ परिस्थितीत सर्वात जास्त काम करण्याची क्षमता एक जिल्हाधिकारी महिलेमध्ये आहे. परंतु तालुक्या स्तरावर अधिकारी कर्मचारी वेळेवर काम करीत नाही कामावर हजर नसतात नागरिकांचे संपर्क होत नाही. काही तहसीलदार मीटिंगच्या नावाखाली चेंबर मध्ये जाऊन बसतात ही परिस्थिती जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनामध्ये आणून दिलेले आहे. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर कामाची मागणी करणाऱ्या प्रत्येक मजुराला तात्काळ रोजगार उपलब्ध करून द्यावा. त्यासाठी ग्रामपंचायतनिहाय पुरेशी कामे मंजूर करून कामांचा 'शेल्फ ऑफ प्रोजेक्ट्स' तयार ठेवावा. तसेच जलसंधारण व मृदसंधारणाची जास्तीत जास्त कामे हाती घेऊन मजुरांना त्यांच्या गावातच रोजगार उपलब्ध करून द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात (दि.६रोजी) जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण विभागाचे अधिकारी तसेच व्ही.बी.जी. राम जी अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांची आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कणवारिया, उपजिल्हाधिकारी (रोहयो) मनिषा दांडगे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकृष्ण वेणीकर, विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण) सुरेश वडोदे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.ग्रामपंचायतनिहाय मजुरांच्या कामाच्या मागणीचा विचार करून आवश्यकतेनुसार जास्तीत जास्त कामे मंजूर करावीत. 'जालना जलकवच' अभियानांतर्गत जलतारा, शोषखड्डे, छतावरील पावसाचे पाणी जमिनीत मुरविणे, गाळ काढणे तसेच अन्य जलसंधारण व मृदसंधारणाची कामे प्राधान्याने सुरू करावीत, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.संभाव्य पाणीटंचाई व दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन जलसाठे निर्माण करणे, भूजलपातळी वाढविणे आणि पावसाच्या पाण्याचे जास्तीत जास्त संधारण करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर प्रभावी नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले. विद्यमान जलसाठ्यांमधील गाळ काढणे, आवश्यक दुरुस्ती करून साठवण क्षमता वाढविणे तसेच संभाव्य चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर योजनेअंतर्गत चारा लागवडीची कामे घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.काम मागणी करणाऱ्या सर्व मजुरांना विलंब न करता काम उपलब्ध करून देण्यासोबतच कामावर येणाऱ्या मजुरांची ई-केवायसी पूर्ण करून घेण्याचे निर्देशही देण्यात आले. ऑक्टोबर २०२६ मध्ये होणाऱ्या ग्रामसभांमध्ये अनुज्ञेय ३७५ कामांची माहिती नागरिकांसमोर प्रदर्शित करून व्हीजीपीपी (तळझीळीं ऋीरा झरपलहरूरीं झश्ररप) आराखडा तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. कामांना प्राधान्यक्रम ठरविताना महिला, भूमिहीन मजूर, अल्पभूधारक आणि संवेदनशील वस्त्यांतील नागरिकांचा सहभाग प्राधान्याने घ्यावा, असेही सांगण्यात आले.

प्राप्त प्रस्ताव, ग्रामपंचायतीचा नकाशा, जल अंदाजपत्रकाचा आराखडा आणि प्रत्यक्ष स्थळ पडताळणीच्या आधारे ग्रामसभा घेऊन कामांचे नियोजन करावे. आर्थिक वर्ष २०२७-२८ साठी व्हीजीपीपी आराखडा २ ऑक्टोबर २०२६ ते १५ जानेवारी २०२७ या कालावधीत तयार करावा. १५ जानेवारीपूर्वी कामकाज व मंजुरीची प्रक्रिया पूर्ण करून युक्तधारा मालमत्ता सूची, पीआरए, गॅप असेसमेंट आणि जिओलोकेशन यांची सांगड घालत अपेक्षित मनुष्यदिवसांसह कामांचा सेल्फ तयार करून आराखडा जिल्हा कार्यालयास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.व्हीबीजी रामजी संकेतस्थळावर 'डशलींश' प्रणालीद्वारे कामांचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यपद्धती तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांना कामांचे मोजमाप घेण्यासाठी ई-मेजरमेंट (ए-चइ) नोंदणी करण्याबाबत कार्यक्रम व्यवस्थापक एस. आर. देवढे यांनी प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले. यावेळी बैठकीत रोजगार हमी योजना, जलसंधारणाची कामे आणि आगामी नियोजनाचा आढावा घेण्यात आला.

# ऊसतोड कामगारांच्या आरोग्यसेवेत खंड पडू देऊ नका- डॉ. नीलम गोऱ्हे

## गर्भाशय शस्त्रक्रिया झालेल्या महिलांना मेनोपॉज क्लिनिकशी जोडण्याच्या सूचना

बीड । प्रतिनिधी

दुष्काळ आणि हंगामी स्थलांतराच्या पार्श्वभूमीवर ऊसतोड कामगार महिला, पुरुष व बालकांच्या आरोग्यसेवेत खंड पडू देऊ नये. अनावश्यक गर्भाशय शस्त्रक्रियांना प्रतिबंध करण्यासोबतच अवैध गर्भलिंग निदानाविरुद्ध आरोग्य विभाग आणि पोलिसांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिल्या. सोनोग्राफी केंद्रे असलेल्या महत्त्वाच्या सार्वजनिक रस्त्यांवर उउढत बसवण्याच्या दृष्टीने आवश्यक ठिकाणांचे प्रस्ताव सादर करावेत, अशी सूचनाही त्यांनी केली.

बीड येथील जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयात आयोजित बैठकीत ऊसतोड कामगारांचे आरोग्य, गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रिया तसेच झउझछऊ्ढ व चढझ कायद्यांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. विधान परिषद सदस्या तथा माजी उपसभापती आणि या दोन्ही कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय कृती दलाच्या अध्यक्ष डॉ. गोऱ्हे यांनी अधिकाऱ्यांकडून प्रगती, अडचणी व पुढील नियोजनाची माहिती घेतली.

प्रत्यक्ष ऊसतोडीसाठी टोळ्यांसोबत जाणाऱ्या महिलांची आरोग्यसाथी म्हणून निवड झाल्याची खात्री करावी. सामाजिक संस्थांनी दिलेली माहिती आणि प्रशासनाकडील यादी यांची पडताळणी करण्यासाठी दोन ते तीन दिवसांत बैठक घ्यावी, अशी सूचना डॉ. गोऱ्हे यांनी केली. स्थलांतर न करणाऱ्या महिलांना गावपातळीवर आरोग्यसाथी म्हणून सहभागी करून घेता येईल; मात्र स्थलांतरित टोळीसोबत प्रशिक्षित आरोग्यसाथी असणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आरोग्यसाथींना ओळखपत्र, पुरेसे प्रशिक्षण आणि प्रथमोपचार साहित्य उपलब्ध असावे, अशी सूचना करण्यात आली. औषधे संपल्यानंतर त्यांचा नियमित पुरवठा व्हावा. संबंधित आरोग्य केंद्रांचे संपर्क क्रमांक उपलब्ध करून औषधांच्या उपलब्धतेची माहिती व्हॉट्सपद्वारे कळवावी, असेही त्यांनी सांगितले. आरोग्य कार्डामध्ये महिला, पुरुष व बालकांच्या गरजांनुसार तपासण्यांची नोंद असावी. रक्तक्षय, मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार तसेच डोळे, कान व दातांच्या तपासण्यांचा समावेश करावा. स्थलांतराचे मार्ग आणि मुक्कामाची ठिकाणे जाणून घेऊन फिरती आरोग्यसेवा व स्थानिक आरोग्य केंद्रांशी संपर्काची व्यवस्था करावी. बालकांचे लसीकरण, पोषण आहार आणि अंगणवाडी सेवांसाठी महिला व बालविकास विभागाशी समन्वय साधावा, असे त्यांनी नमूद केले.खाजगी रुग्णालयांतील गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रियांची वैद्यकीय आवश्यकता आणि संबंधित नोंदी तपासाव्यात.



अनावश्यक शस्त्रक्रिया आढळल्यास प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या शिफारशी कराव्यात. बीडमधील महिलांच्या लगतच्या जिल्ह्यांत झालेल्या शस्त्रक्रियांची माहिती मिळवण्याचा विषय राज्यस्तरीय बैठकीत चर्चेसाठी मांडण्यात येईल, असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.गर्भाशय शस्त्रक्रिया झालेल्या महिलांचा नियमित आरोग्य पाठपुरावा करावा. त्यांना आवश्यकतेनुसार रजोनिवृत्ती अर्थात मेनोपॉज क्लिनिकशी जोडून शारीरिक व मानसिक आरोग्यविषयक समुपदेशन, पोषणविषयक मार्गदर्शन आणि आवश्यक उपचार उपलब्ध व्हावेत. महिलांचे स्वमदत गट तयार करून त्यांचे मनोबल वाढवावे. गर्भाशयाच्या आजारांविषयी आणि कर्करोगाच्या भीतीविषयी योग्य माहिती देऊन अनावश्यक शस्त्रक्रिया टाळण्यासाठी जनजागृती करावी, अशी सूचना त्यांनी केली.

**मनीषा टोकले व ॲड. संगीता चव्हाण यांनी मांडले प्रश्न**

मनीषा टोकले व ड. संगीता चव्हाण यांनी चर्चेत दुष्काळामुळे वाढलेले स्थलांतर, आरोग्यसेवेपासून वंचित राहणारे कामगार, आरोग्यसाथींच्या निवडीतील त्रुटी आणि औषधपुरवठ्यातील अडचणी मांडल्या. गर्भाशय शस्त्रक्रिया झालेल्या महिलांच्या समुपदेशन व नियमित आरोग्य पाठपुराव्याची गरजही अधोरेखित करण्यात आली.अवैध गर्भलिंग निदान रोखण्यासाठी जिल्हास्तरीय कृती दलाची रचना व सदस्यांचे नामनिर्देशन शासन निर्देशांनुसार तपासून नियमित बैठका घ्याव्यात. सामाजिक क्षेत्रातील सक्रिय महिलांचा सहभाग वाढवून माहिती संकलन, जनजागृती आणि कार्यवाहीचा पाठपुरावा मजबूत करावा, असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

सोनोग्राफी केंद्रांची नोंदणी प्रमाणपत्रे, 'फॉर्म एफ' आणि संबंधित अभिलेखांची नियमानुसार तपासणी करावी. पशुवैद्यकीय सोनोग्राफी यंत्रांचा मानवी गर्भलिंग निदानासाठी गैरवापर होत असल्याच्या तक्रारींची पुराव्यांसह चौकशी करावी. ऑनलाइन विक्री व जाहिरातींबाबतच्या तक्रारीही पडताळून संबंधित यंत्रणांकडे पाठवाव्यात, अशी सूचना त्यांनी केली.

अनधिकृत व्यक्तींकडून होणारे गर्भपात व इतर गैरप्रकार रोखण्यासाठी तपासणी मोहीम राबवावी. झउझछऊ्ढ व चढझ प्रकरणांतील तपास आणि कार्यवाहीसाठी आरोग्य विभाग व पोलिसांनी संयुक्त कार्यपद्धती निश्चित करावी. नियमांचे पालन करणाऱ्या डॉक्टरांनी तपासणीला सहकार्य करावे; तपासणीच्या नावाखाली धमकावणे किंवा गैरप्रकार होऊ नयेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

सोनोग्राफी केंद्रे असलेल्या बीड शहर व तालुक्यांतील महत्त्वाच्या सार्वजनिक रस्त्यांवर उउढत बसवण्यासाठी आवश्यक ठिकाणांची यादी व प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना डॉ. गोऱ्हे यांनी आरोग्य विभागाला दिल्या. संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यास आणि अवैध गर्भलिंग निदानाला प्रतिबंध करण्याच्या प्रयत्नांना यामुळे मदत होईल, असे त्यांनी सांगितले. तक्रारींसाठी स्वतंत्र संपर्क सुविधा उपलब्ध करून तक्रारदारांची गोपनीयता जपण्यावरही त्यांनी भर दिला.

चढझ सेवांसाठी येणाऱ्या महिलांना गोपनीयता, सन्मान आणि त्यांच्या अधिकारांचा आदर राखून सुरक्षित उपचार व समुपदेशन मिळावे. खाजगी रुग्णालयांतील समुपदेशन व्यवस्था सक्षम करण्यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशनशी संवाद साधावा. अल्पवयीन मुलींची गर्भधारणा, बालविवाह व लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांत उपचारात अडथळा येऊ न देता आवश्यक नोंदी, कायदेशीर कार्यवाही आणि समुपदेशनाचा समन्वय साधावा, असे त्यांनी सांगितले. आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका आणि सामाजिक कार्यकर्त्यांना जनजागृतीत सहभागी करून घ्यावे. पुढील बैठकीत महिला व बालविकास, ग्रामविकास, सामाजिक न्याय व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना सहभागी करावे. अंमलबजावणीतील अडचणी व सुधारणा प्रस्ताव लेखी सादर करावेत, असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. बैठकीस डॉ. सतिश सोळंकी व संबंधित आरोग्य अधिकारी, मनीषा तोकले, ड. संगीता चव्हाण, कला शिंदे, रंजना कुलकर्णी आणि सुनीता मोरे उपस्थित होत्या.

# हिंदू सण-उत्सवांना विरोध करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा

### शहरातील फुलेनगर येथील हिंदू महिलांचे पोलिसांना निवेदन; गणेशोत्सव व नवरात्र उत्सवासाठी योग्य बंदोबस्ताची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्रात हिंदूंचे विविध सण व उत्सव मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. मात्र,माजलगाव शहरातील फुलेनगर येथील हिंदूंच्या धार्मिक सण-उत्सवांना विरोध करून सामाजिक वातावरण बिघडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी माजलगाव शहरातील फुलेनगर येथील हिंदू महीलांनी दि ०८ ऑक्टोबर गुरुवार रोजी पोलिस प्रशासनाकडे तक्रारी द्वारे केली आहे.

याबाबत माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना ८ ऑक्टोबर २०२६ गुरुवार रोजी फुलेनगर भागातील हिंदू महिलांनी निवेदन देण्यात आले.दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, हिंदू धर्मीय नागरिकांना गणेशोत्सव, नवरात्रोत्सव तसेच इतर धार्मिक कार्यक्रम साजरे करण्याचा संविधानाने अधिकार दिलेला आहे.या उत्सवांच्या माध्यमातून धार्मिक भावना जपण्यासोबतच सामाजिक एकोपा आणि बंधुभाव वाढविण्याचा प्रयत्न केला जातो.

मात्र,शहरातील काही ठिकाणी गणेशोत्सव व नवरात्र उत्सव साजरा करताना अडथळे निर्माण करण्याचे तसेच आयोजकांना त्रास देण्याचे प्रकार होत असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे.धार्मिक कार्यक्रमांमध्ये जाणीवपूर्वक विघ्न आणणाऱ्या ◀◀ पान ३ वर

# बेवारस मृतदेहाची ओळख पटविण्यासाठी शिवाजीनगर पोलिसांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

पोलीस स्टेशन शिवाजीनगर, बीड हद्दीत फिनिक्स हॉस्पिटलच्या बाजूस दिनांक ०६ ऑक्टोबर २०२६ रोजी एका अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आला आहे. सदर मृतदेहाची अद्याप ओळख पटलेली नाही.



सदर मृत इसमाचे वय अंदाजे ४५ वर्षे असून त्याच्या अंगावर फिकट रंगाचा व राखाडी पट्टे असलेला टी-शर्ट व पँट आहे. इसमाचे केस काळे-पांढरे असून दाढी काळी-पांढरी आहे.

सदर मृतदेहाची ओळख पटविण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू असून, वरील वर्णनातील व्यक्ती आपल्या परिचयाची किंवा नातेवाईकाची असल्यास नागरिकांनी तात्काळ पोलीस स्टेशन शिवाजीनगर, बीड येथे संपर्क साधावा.

तपास अधिकारी : ग्रेड PSI कुवारे मो. ९०२२०५१२०२

सदर मृत इसमाची ओळख पटविण्यासाठी त्याचा फोटो प्रसिद्ध करण्यात येत असून, नागरिकांनी ओळख पटविण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस स्टेशन शिवाजीनगर, बीड यांच्याकडून करण्यात येत आहे.

# बीड-जाटनांदुर सायंकाळची बससेवा तात्काळ सुरू करा-ॲड. प्रकाश कवठेकर

बीड । प्रतिनिधी

बीड आगारातून सायंकाळी ५.३० वाजता सुटणारी बीड-जाटनांदुर बससेवा गेल्या तीन दिवसांपासून कोणतीही पूर्वसूचना न देता बंद करण्यात आल्याने जाटनांदुर, डोंगरकिन्ही, गारमाथा, निरगुडी, तगारा व परिसरातील विद्यार्थी, महिला, नोकरदार, शेतकरी आणि सर्वसामान्य प्रवाशांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. त्यामुळे ही बससेवा तात्काळ आणि कोणत्याही परिस्थितीत पूर्ववत सुरू करावी, अशी ठाम मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य ड. प्रकाश कवठेकर यांनी केली आहे.

सायंकाळी शाळा व महाविद्यालये सुटल्यानंतर विद्यार्थ्यांना घरी परतण्यासाठी ही बस अत्यंत आवश्यक आहे. बस बंद करून विद्यार्थ्यांना खासगी वाहनांचा महागडा आणि असुरक्षित पर्याय स्वीकारण्यास भाग पाडणे अत्यंत गंभीर बाब आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आणि सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असताना प्रशासनाने याकडे दुर्लक्ष करू नये.

बससेवा बंद असल्याने विद्यार्थ्यांसह महिला व ज्येष्ठ नागरिकांना सायंकाळच्या वेळी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. खासगी वाहतूक उपलब्ध नसल्यास क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी घेणाऱ्या वाहनांचा आधार घ्यावा लागण्याची शक्यता असून, त्यामुळे प्रवाशांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो.

एसटी महामंडळ ही जनतेची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आहे. नफ्या-तोट्याच्या कारणांपेक्षा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शिक्षण, नागरिकांची सुरक्षितता आणि त्यांच्या दैनंदिन प्रवासाचा प्रश्न अधिक ◀◀ पान ३ वर

# माळापुरी-पेंडगाव-घोसापुरी एमआयडीसी प्रस्तावाला शेतकऱ्यांचा तीव्र विरोध!

### शेतकऱ्यांची जमीन वाचवण्यासाठी रस्त्यावर उतरणार -अशोकराव हिंगे

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील माळापुरी, पेंडगाव आणि घोसापुरी शिवारात प्रस्तावित एमआयडीसीला शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शविला असून, जमीन वाचवण्यासाठी आता रस्त्यावर उतरू, असा स्पष्ट इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अशोकराव हिंगे यांनी दिला आहे.



सुरुवातीपासूनच या प्रस्तावाला शेतकऱ्यांचा विरोध असून, मार्च २०२६ मध्ये संबंधित शेतकऱ्यांनी प्रशासनाला लेखी निवेदन देऊन आपली भूमिका स्पष्ट केली होती. मात्र, त्यांच्या मागणीचा प्रशासनाकडून गांभीर्याने विचार झालेला नसल्याने परिसरात संतापाचे वातावरण आहे.

सुमारे १,०५० एकर जमीन भूसंपादनाच्या प्रस्तावाने शेतकरी धास्तावले

माळापुरी, पेंडगाव आणि घोसापुरी परिसरातील सुमारे १,०५० एकर जमीन भूसंपादनाच्या प्रस्तावात असल्याचे सांगण्यात येत आहे. या भूसंपादनामुळे शेकडो शेतकरी भूमिहीन होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ही शेतजमीन शेतकरी कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा मुख्य आधार आहे.

पिढ्यान्पिढ्या कसली जाणारी ही जमीन सुपीक असून, कमी पावसातही चांगले उत्पादन देणारी असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. जमीन गेली तर केवळ शेती जाणार नाही, तर शेतकरी कुटुंबांच्या जगण्याचा आधारच हिरावला जाणार आहे, अशी भावना व्यक्त करण्यात आली आहे.

'शेतजमीन वाचवा' म्हणत सर्वेक्षणालाही विरोध

जिल्हा प्रशासनाकडून संबंधित परिसरात सर्वेक्षणाचे काम सुरू करण्यात आले असून, त्यालाही शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला आहे. शेतकऱ्यांना विश्वासात न घेता भूसंपादनाची प्रक्रिया पुढे नेऊ नये, अशी ठाम भूमिका घेण्यात आली आहे. याबाबत अशोकराव हिंगे, शामराव ◀◀ पान ३ वर

# दुष्काळात शेतकऱ्यांची कर्जासाठी फरफट

### राष्ट्रीयीकृत बँकांना टाळे ठोकण्याचा भाई थावरे यांचा इशारा

माजलगाव । प्रतिनिधी

गेल्या वर्षीच्या सरसकट कर्जमाफीच्या मागणीच्या पार्श्वभूमीवर ज्या शेतकऱ्यांच्या नावावर कर्ज आहे, मात्र कर्ज निल झालेले नाही, अशा शेतकऱ्यांना नवीन कर्ज मिळवण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. दुष्काळी परिस्थितीतही कर्जासाठी शेतकऱ्यांना दलालांमार्फत बँकांच्या चकरा माराव्या लागत असल्याचा आरोप शेतकरी संघर्ष समितीने केला आहे. या प्रश्नाकडे प्रशासनाने तातडीने लक्ष न दिल्यास राष्ट्रीयीकृत बँकांना टाळे ठोकण्याचा इशारा भाई गंगाभीषण थावरे यांनी दिला आहे.

**कर्जमंजुरीसाठी लाच द्यावी लागत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे**

दरम्यान, बीड जिल्ह्यातील स्टेट बँक ऑफ इंडिया, ग्रामीण बँक तसेच इतर राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये कर्जाची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकऱ्यांची आणखी आर्थिक पिळवणूक होऊ नये, यासाठी प्रशासनाने तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी करण्यात आली आहे. मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास बँकांना टाळे ठोकण्याचा इशारा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने भाई गंगाभीषण थावरे यांनी दिला आहे.



यासंदर्भात शेतकरी संघर्ष समितीचे भाई थावरे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, सध्या शेतकऱ्यांनी पीक घेतले आहे. मात्र, जनावरांना चारा नाही, मुलांच्या शिक्षणाचा खर्च आहे. अशा परिस्थितीत शेतकरी कर्जासाठी बँकेत जात असताना काही बँक कर्मचारी व संबंधित व्यक्तींमार्फत कर्जप्रकरणे पुढे नेण्यासाठी दलाली केली जात असल्याचा आरोप भाई गंगाभीषण थावरे यांनी केला आहे.

कर्जासाठी बँकेत गेल्यानंतर फाईल पुढे गेली नाही तर तारीख पे तारीख सांगितली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांची मोठी अडचण होत आहे. एका फाईलसाठी १० ते १५ हजार ◀◀ पान ३ वर

# मी जे बोलतो ते करूनच दाखवतो; कुणीही धीर सोडू नये जिथं विषय गंभीर तिथ मी खंबीर,शेतकऱ्यांनी हवालदिल होता कामा नये -आ.धस

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यात दुष्काळाची परिस्थिती अत्यंत गंभीर स्वरूप धारण करीत असल्याने नागरिकांना आणि शेतकऱ्यांना या संकटातून आधार देण्यासाठी शासनाकडे ठोस उपाययोजनांची मागणी करून ती मंजूरच करून घेणार दुष्काळग्रस्तांना आधार देण्यासाठी शासन गंभीर आहे आणि मी पण खंबीर असून शेतकऱ्यांनी हवालदिल होता कामा नये.पशुधनासोबतच फळबाग धारक शेतकऱ्यांसाठी दीड ते दोन लाख रुपये हेक्टर अनुदानाची मागणी करणार असून मी जे बोलते ते करूनच दाखवतो हे सगळ्यांना माहिती आहे.फक्त नागरिकांनी अशा परिस्थितीत स्थलांतर करता कामा नये.तुमच्या हाताला रोजगार कसा मिळेल यावर देखील सरकारला विनंती करणार असल्याचे आ. सुरेश धस यांनी सांगितले.तसेच जनावरांची संख्या मोजता येईल त्याचा फॉर्म्युला मी सरकारला देणार असल्याचे सांगत शेतकऱ्यांच्या मागणीनुसार दिवाळीपर्यंत चारा डेपो आणि त्यानंतर चारा छावण्या सुरू करण्यात येतील,असेही आ.धस यांनी यावेळी आश्र्वासित केले.आष्टी मतदार संघात जिल्हा परिषद गट निहाय दुष्काळी दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर आगामी उपाययोजनांसंबंधी धस यांनी शेतकरी, पशुपालक,फळबाग उत्पादक, कार्यकर्ते, आणि स्थानिक नागरिकांशी संवाद साधला.



आगामी काळात पशुधन कसे जगवावे हा प्रश्न गंभीर झाला आहे.यावर शेतकऱ्यांनी धस यांना दिवाळी पर्यंत चारा डेपो तात्काळ सुरू करण्याची मागणी केली.त्यानुसार दिवाळी पर्यंत चारा डेपो त्यानंतर चारा छावण्या सुरू करण्याची मागणी करणार असून,हे सांगताना मात्र चारा छावण्या करताना प्रत्येक वस्तीनिहाय किमान २०० ते २५० जनावरांची क्षमता असलेली चारा छावणी असाव्यात अशी मागणी आपण सरकार दरबारी करणार आहोत. जेणेकरून शेतकऱ्यांची चाऱ्याची आणि पाण्याची कुठलीही गैरसोय होणार नाही याची जाणीव या छावणी चालकांना राहील. केसरी कूपन असणाऱ्यांना धान्य पुरवठा कसा परत मिळेल यासाठी प्रामाणिक प्रयत्न सुरू रहातील असे सांगत शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी निर्माण होणार नाहीत असेही आ.धस यावेळी म्हणाले.

तसेच २०१२ मध्ये फळबागांसाठी फळबाग धारक शेतकऱ्यांचे शिष्ट मंडळ आणि मी दिल्लीला जाऊन त्यावेळी ४५ हजार रुपयांचे अनुदान मिळवून देण्याचे काम केले.आता तब्बल १४ वर्षांचा कालावधी लोटला आहे. वाढलेला उत्पादन खर्च, मजुरी, सिंचन आणि देखभालीचा खर्च लक्षात घेता सध्याच्या परिस्थितीत ◀◀ पान ३ वर

# महेश सहकारी साखर कारखान्याचा २६ वा गळीत हंगाम; १२ ऑक्टोबरला बॉयलर अग्निप्रदीपन



**सोमवारी मान्यवर संतांच्या शुभहस्ते होणार अग्निप्रदीपन**

आष्टी । प्रतिनिधी

कडा येथील महेश सहकारी साखर कारखाना लि. कडा साखरच्या सन २०२६-२०२७ च्या २६ व्या. गळीत हंगामाचा शुभारंभ लवकरच होत आहे. या पार्श्वभूमीवर कारखान्याचा बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ सोमवार, दि.१२ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११.१५ वाजता कारखाना स्थळावर आयोजित करण्यात आला आहे.

या धार्मिक व औपचारिक सोहळ्याचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र भूषण माजी आमदार भीमराव धोंडे भूषविणार आहेत. प्रमुख संतांच्या शुभहस्ते अग्निप्रदीपन समारंभ संपन्न होणार असून यावेळी ह.भ.प. विठ्ठल महाराज (गहीनाथगड), ह.भ.प.प्रकाश बोधले महाराज, ह.भ.प.रामकृष्ण रंधवे बापू महाराज,ह.भ.प. बबन महाराज बहीरवाल आणि ह.भ.प.अशोक महाराज भोसले यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

या कार्यक्रमास कारखान्याचे चेअरमन डॉ. अजय धोंडे, व्हाईस चेअरमन दादासाहेब जगताप, कार्यकारी संचालक गिरीश झगडे यांच्यासह सर्व संचालक मंडळ,अधिकारी, कर्मचारी व कामगार उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी परिसरातील शेतकरी व ऊस उत्पादकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कारखान्याच्या वतीने करण्यात आले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26